रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १५ ◆ अंक २८८
www.ramprahar.com
# राम प्रहर
रविवार, ७ मे २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## मुंबईचा महापौर बंगला लोकांना विचारून ढापला का? -राज



**रत्नागिरी** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची शनिवारी (दि. ६) रत्नागिरी येथे जाहीर सभा झाली. या वेळी त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. पक्ष नसलेल्या पक्षाचे अध्यक्ष येऊन गेले. आता सांगतात जी लोकांची भावना ती आमची भावना आहे. बाळासाहेबांच्या नावाने मुंबईचा महापौर बंगला जो ढापला तो लोकांना विचारून ढापला का? लोक निवडून देतात तेव्हा लोकांचे हित पाहिलेच पाहिजे. लोकांची काळजी घ्यायची असते, मात्र हे लोकं लोकांना फसवत आले, मूर्ख बनवत आले. ही माणसं कधी प्रदेशाची धूळधाण करतील हे समजणार नाही, असे राज म्हणाले. या सर्वातून माझा कोकण वाचवा आणि मी सांगितलेल्या गोष्टींचा गांभीर्याने विचार करा, असे आवाहनही राज यांनी या वेळी केले.

अंतरंग

कर्नाळा अभयारण्यात वन्यजीवांची गणना/२
रविवारनिमित्त 'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४
परेश ठाकूर यांच्या हस्ते चॅम्पियन्स लीगचे उद्घाटन/८

# उद्धव ठाकरे महाराष्ट्राला कलंक

## बारसू दौऱ्यावरून ना. नारायण राणेंचे टिकास्त्र



**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे म्हणजे महाराष्ट्राला लागलेला कलंक आहे, अशा शब्दांत त्यांच्यावर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी जळजळीत टीका केली आहे. ठाकरे गटाचे प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी (दि. ६) राजापुरातील बारसू परिसराचा दौरा केला. या दौऱ्यानंतर ना. राणे यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेत त्यांचा आपल्या शैलीत समाचार घेतला.

ना. राणे म्हणाले की, बारसूत प्रस्तावित जागेत उद्ध्वस्त ठाकरे पोहचले, त्यानंतर ते सोलगावला गेले व काही लोकांना भेटले. त्यांच्या सभेला पोलिसांनी परवानगी नाकारली. त्यामुळे मी माझा दौरा रद्द केला. उद्धव ठाकरे बरेच काही बडबडले आहेत. त्यात त्यांनी अनेक धमक्या दिल्या. महाराष्ट्र पेटविन वगैरे त्यांची वाक्ये आहेत, पण उद्धव ठाकरे आज स्वतः कोण आहेत याची जाणीव त्यांना आहे का? ते म्हणताहेत प्रकल्प जर सुरू केला, तर आम्ही महाराष्ट्र पेटवू, पण त्यांचे ४० आमदार गेले. आता १०-१२ आमदारच असतील. स्वतःला दीर्घकाळ चालता येत नाही. कोणावर हात वर करू शकत नाहीत. तरीही पेटवूची भाषा का बोलतात हे कळत नाही. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले तेव्हा तिथले कर्मचारी बोलले की आधीचे मुख्यमंत्री फक्त दोनदा आले. मग पेटवायला कधी फिरणार? हेलिकॉप्टरमध्ये मशाल घेऊन जाणार का, अशी खिल्ली ना. राणेंनी उडवली.

ना. राणे पुढे म्हणाले, महाराष्ट्रात एवढे नेते आहेत. प्रकल्पाला विरोध करणारे नेते किती? मी कोकणातला आहे. एन्रॉन आला त्याला विरोध, जैतापूरला विरोध, महामार्गाच्या कामाला विरोध, विमानतळाला विरोध, प्रत्येक विकासाच्या कामाला शिवसेनेने विरोध केला आहे. यांना कोकणाबद्दल आस्था, प्रेम की द्वेष आहे? कोणताही प्रकल्प अडीच वर्षांत कोकणात आणला नाही. कोकणाच्या विकासात यांचे काहीच योगदान नाही.

कोकणचा कॅलिफोर्निया करू म्हणाले, पण कॅलिफोर्नियामध्ये काय आहे ते पहा. कॅलिफोर्नियात १४ रिफायनरी प्रकल्प आहेत. तिथे पर्यावरण नाही का? मग इथेच विरोध का, असा सवालही ना. राणे यांनी या वेळी उपस्थित केला.

## स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धेचे आज पारितोषिक वितरण

### गुणीजनांचाही होणार मान्यवरांच्या हस्ते सन्मान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते, थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३५व्या पुण्यतिथीनिमित्ताने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या संस्था आणि व्यक्तींचा गुणगौरव तसेच पनवेल तालुकास्तरीय स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२३चा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. हा समारंभ स्व. जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथी दिनी म्हणजेच रविवारी (दि. ७) सकाळी १० वाजता उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे होणार आहे.

या सोहळ्याचे अध्यक्षस्थान जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर भूषविणार आहेत. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर, खजिनदार भाऊशेठ पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, सदस्य अनिल भगत, प्रकाश भगत, संजय पाटील, संजय भगत, वसंत पाटील, हरिश्चंद्र पाटील आदी मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. तत्पूर्वी, सकाळी ९ वाजता शेलघर येथील निवासस्थानी भगतसाहेबांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात येणार आहे.




चेन्नई : चेपॉक स्टेडियमवर शनिवारी झालेल्या घरच्या मैदानावर चेन्नई सुपर किंग्जने मुंबई इंडियन्सवर सहा गड्यांनी दणदणीत विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना मुंबईने आठ गडी गमावून १३९ धावा केल्या होत्या. हे माफक आव्हान चेन्नईने १७.४ षटकांत पार केले.

## महाडच्या स्नेहल जगताप काँग्रेसमधून ठाकरे गटात

**महाड : प्रतिनिधी**

महाडच्या माजी नगराध्यक्ष आणि काँग्रेस नेत्या स्नेहल जगताप यांनी शनिवारी (दि. ६) ठाकरे गटात प्रवेश केला. ठाकरे गटाचे प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या महाडमधील जाहीर सभेदरम्यान जगताप यांचा पक्षप्रवेश झाला.

या सभेस माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते, राज्याचे माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई, महिला नेत्या सुषमा अंधारे आदी उपस्थित होते. दरम्यान, जगताप यांनी ठाकरे गटात प्रवेश केल्याने आता काँग्रेसची भूमिका काय असेल हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.




# तळोजा फेज १ मधील नागरिकांना मिळणार मुबलक पाणी

## भाजपच्या पाठपुराव्यामुळे नवी टाकी कार्यान्वित



**तळोजा : रामप्रहर वृत्त**

तळोजा फेज १ येथील पाण्याची टाकी कार्यान्वित झाल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह भाजप नेत्यांच्या अनेक वर्षांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. तब्बल पाच वर्षांपेक्षा जास्त काळ अपुऱ्या तसेच कमी दाबाने होणाऱ्या पाणीपुरवठ्याने हैराण झालेल्या तळोजा फेज १ मधील रहिवाशांची प्रतीक्षा यामुळे संपली असून नव्या पाण्याच्या टाकीतून पाणीपुरवठा होणार असल्याने येथील रहिवाशांना आता मुबलक पाणी मिळणार आहे. या वेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर उपस्थित होते.

तळोजात कमी दाबाने होणाऱ्या पाणीपुरवठ्यामुळे अनेक सोसायट्यांपर्यंत ते पोहचत नव्हते. या संदर्भात भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, भाजप नेते प्रल्हाद केणी तसेच माजी नगरसेवक हरेश केणी यांनी पाठपुरावा करून सिडकोच्या पाणीपुरवठा विभागासोबत बैठका घेतल्या. भाजप नेत्यांच्या या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून सेक्टर ८ येथील पाण्याची टाकी शुक्रवार (दि. ५) पासून कार्यान्वित झाली आहे.

तळोजा फेज १मध्ये एमआयडीसीच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जातो. शहराला पाच एमएलडी पाण्याची गरज आहे. थेट सिडको या ठिकाणी पाणीपुरवठा करीत नाही. नव्याने कार्यान्वित झालेल्या टाकीमुळे पाण्याची साठवण क्षमता वाढणार आहे. **(पान २ वर..)**

## निवडक

### काश्मिरमध्ये पुन्हा चकमक; दोन दहशतवाद्यांचा खात्मा

**श्रीनगर** : जम्मू काश्मिरच्या राजौरीत भारतीय लष्कर आणि दहशतवादी यांच्यात चकमकी सुरूच असून ऑपरेशन त्रिनेत्रा अंतर्गत राजौरी आणि बारामुल्ला जिल्ह्यात शनिवारी (दि. ६) दोन दहशतवाद्यांचा खात्मा करण्यास जवानांना यश मिळाले आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून अशांत असलेल्या या भागात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला.

### मणिपूरमधील हिंसाचारात ५४ जणांचा मृत्यू; परिस्थिती नियंत्रणात

**इंफाळ** : आदिवासी-बिगर आदिवासी यांच्यात झालेल्या संघर्षामुळे मणिपूरमध्ये मागील काही दिवसांपासून हिंसाचार उफाळला असून यात आतापर्यंत ५४ जणांचा मृत्यू झाला आहे. लष्कराने राज्यातील परिस्थिती नियंत्रणात आणली असून राजधानी इंफाळमधील जनजीवन पूर्वपदावर येऊ लागले आहे.

### पुण्यात गोदामाला आग; तीन कामगारांचा मृत्यू

**पुणे** : इव्हेंटचे मटेरियल असणाऱ्या गोदामाला आग लागून तीन कामगार मृत्युमुखी पडल्याची घटना वाघोलीतील उबाळे नगर परिसरात शुक्रवारी रात्री घडली. गोदामाला लागूनच मागे काही खोल्या आहेत. तेथे हे कामगार राहत होते. यातील दोघांचा होरपळून, तर एकाचा पाण्याच्या हौदात पडून मृत्यू झाल्याचे शनिवारी (दि. ६) पहाटे निदर्शनास आले.



# सुदानमध्ये अडकलेले भारतीय मायदेशी परतले



**सुदान : वृत्तसंस्था**

सुदानमधील देशांतर्गत युद्धात अडकून पडलेल्या भारतीयांची सुटका करण्यासाठी परराष्ट्र मंत्रालयाने २४ एप्रिलपासून 'ऑपरेशन कावेरी'ही मोहीम सुरू केली होती. या मोहिमेद्वारे जल आणि हवाई मार्गाने हजारो भारतीयांना मायदेशात परत आणण्यात भारत सरकार यशस्वी झालं आहे. या मोहीमेअंतर्गत तब्बल ३,८६२ भारतीय सुखरूप मायदेशी परतले आहेत. त्यानंतर आता ही मोहीम बंद करण्यात आली आहे. भारतीय वायूसेनेचं शेवटचं विमान शुक्रवारी ४७ भारतीय नागरिकांना घेऊन मायदेशी परतलं. त्यानंतर ही मोहीम थांबवत असल्याचं सरकारकडून सांगण्यात आलं आहे.

सुदानचे लष्करप्रमुख जनरल अब्देल फताह बुरहान आणि 'रॅपिड सपोर्ट ग्रुप' (आर.एस.एफ.) या निमलष्करी दलाचे प्रमुख जनरल मोहम्मद हमदान दगालो या दोन बलवान नेत्यांमध्ये सत्तेसाठी संघर्ष पेटला आहे. युद्धविरामाची शक्यता मावळल्यानंतर विविध देशांनी आपले राजनैतिक अधिकारी आणि नागरिकांना सुदानबाहेर काढण्याची प्रक्रिया हाती घेतली. सुदानमध्ये जवळपास चार हजारांच्या आसपास भारतीय नागरिक होते. दरम्यान, भारत सरकारने ३,८६२ नागरिकांना मायदेशी परत आणलं आहे.

सुदानमध्ये अडकलेल्या भारतीयांना मायदेशात परत आणण्यासाठी भारतीय हवाई दलाच्या विमानांनी १७ उड्डाणं केली. तसेच भारतीय नौदलाने पोर्ट सुदानहून भारतीयांना सौदी अरबच्या जेद्दा बंदरावर आणलं. तिथून पाच विमानांनी उड्डाण केलं. तसेच परराष्ट्र मंत्रालयाने सुदानच्या सीमेला लागून असलेल्या देशांमधील मार्गांनी ८६ भारतीयांना मायेशी आणलं. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने सुदानमधून भारतीयांना बाहेर काढण्याच्या प्रक्रियेत मदत केल्याबद्दल सौदी अरबचे आभार मानले. तसेच चाड, इजिप्त, फ्रान्स, दक्षिण सुदान, संयुक्त अरब अमिराती, ब्रिटन, अमेरिका आणि संयुक्त राष्ट्रांचे आभार मानले.

ऑपरेशन कावेरीबद्दल परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर म्हणाले, या मोहिमेत सहभागी झालेल्या सर्वांचं कौतुक करायला हवं. त्यांच्या धैर्याचं कौतुक व्हायला हवं. खार्तूम (सुदान) येथील आमच्या दूतावासाने या कठीण काळात विलक्षण समर्पण दाखवलं आहे.

# आगीमुळे कर्जत रेल्वेमार्ग ठप्प

## अंबरनाथ स्टेशनमध्ये विजेच्या साहित्य खोलीला आग



**मुंबई : प्रतिनिधी**

अंबरनाथ रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक एकपासून जवळच असलेल्या विजेच्या साहित्य खोलीला दुपारच्या सुमारास लागलेल्या आगीमुळे कर्जत मार्गावरची रेल्वे सेवा ठप्पा झाली होती. सुमारे एक तास हा मार्ग ठप्प असल्याची माहिती प्रवाशांनी दिली आहे. त्याचा प्रवाशांना फटका बसला.

अंबरनाथ रेल्वे स्थानकात कर्जत दिशेला फलाट क्रमांक एकच्या समोर रेल्वे रुळाच्या बाजूलाच रेल्वेची विद्युत साहित्य ठेवण्याची खोली आहे. या खोलीमध्ये असलेल्या वाहिन्यांना शनिवारी दुपारच्या साडे तीन ते चारच्या सुमारास अचानक आग लागली. या आगीमुळे धुराचे लोट मोठ्या प्रमाणात निघू लागले. त्यामुळे कर्जतकडे जाणारा रेल्वे मार्ग बंद करण्याची वेळ रेल्वे प्रशासनावर आली. या आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. चाळीस मिनीटे आग विझवण्यात गेली अशी माहिती अग्नीशमन दलाचे प्रमुख सोनोने यांनी दिली. या खोलीत असलेल्या विद्युत साहित्य, वाहिन्यांमुळे आग लागल्याची माहिती त्यांनी दिली. मात्र यामुळे कर्जतकडे जाणाऱ्या रेल्वे मार्ग सुमारे तासाभर बंद होता. अंबरनाथ रेल्वे स्थानकात एक मेल एक्सप्रेस उभी करून ठेवण्यात आली होती. त्यामागे लोकलही खोळंबल्या होत्या. त्याचा फटका प्रवाशांना बसला.

# सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

**नवी मुंबई : बातमीदार**

सासरच्या लोकांकडून होणाऱ्या मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून विवाहितेने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. उलवे सेक्टर-९ भागात राहणाऱ्या विवाहितेने तिसऱ्या मजल्यावरील घरातील बेडरूममधून उडी घेऊन आपले जीवन संपवले.

न्हावा-शेवा पोलिसांनी मृत विवाहितेच्या पतीसह सासू-सासऱ्याविरोधात हुंडाबळीसह छळवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. पूनम माधनकर (वय २६) असे मृत विवाहितेचे नाव आहे. लग्नात पूनमच्या वडिलांनी वरपक्षाच्या मागणीनुसार स्वप्नीलच्या आई-वडिलांना एक लाख ५१ हजार रुपये हुंड्याची रक्कम दिली होती. तसेच लग्नाचा संपूर्ण खर्चदेखील त्यांनीच केला होता.

लग्नानंतर पूनम पती व सासू सासऱ्यासह उलवे सेक्टर-९ मधील पारस रॉयल सोसायटीत राहत होती. पूनमच्या पतीने व सासू-सासऱ्यांनी घरातील किरकोळ कारणावरून तिला टोमणे मारून, भांडण काढून तिला मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. तसेच पती स्वप्नीलने त्याच्या आई-वडिलांच्या सांगण्यावरून तिला सतत मारहाण करण्यास सुरुवात केली. सासरकडील मंडळींचा हा त्रास असह्य झाल्याने पूनमने तिसऱ्या मजल्यावरून खाली उडी टाकली. यात गंभीर जखमी झालेल्या पूनमचा रुग्णालयात नेण्यापूर्वीच मृत्यू झाला. पोलिसांनी पूनमचा पती स्वप्नील माधनकर (वय ३२), सासू सुनंदा माधनकर (वय ५८) व सासरे समाधान माधनकर (वय ६४) या तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# श्री स्वामी समर्थ मठाचा भूमिपूजन सोहळा



**तळा : रामप्रहर वृत्त**

श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास केंद्र अंबरनाथ संचलित उपकेंद्र राणेचीवाडी येथे श्री स्वामी समर्थ मठाचा भूमिपूजन समारंभ आत्माराम चव्हाण सपत्निक करण्यात येऊन शनिवारी पुजा व श्रीफळ वाढवून करण्यात आला.

श्रीस्वामी समर्थ मठासाठी महाड-पोलादपूरचे आमदार भरतशेठ गोगावले यांच्या आमदार निधीतून २५ लक्ष रुपये नीधी उपलब्ध करून दिला असून त्याचे भूमिपूजन करण्यात आले गेले. श्री स्वामी समर्थ मठ परमपूज्य गुरुवर्य वै. अण्णा मस्के यांच्या प्रेरणेतून मठ स्थापना करण्याचा निश्चय केला होता. त्यासाठी कै. बाळकृष्ण लक्ष्मण चव्हाणकुटुंबियांनी जागा दान केलीअसल्याने आज त्याचाभूमिपूजन होऊन लवकरच पूर्णत्वास जाईल याची खात्री प्रमोद घोसाळकर यांनी दिली. तालुक्याचा विकास करत असतानाएकमेकांच्या प्रयत्नांतून सहकार्यातून विकास करायचा पाहिजे, असे आवाहन जिल्हाप्रमुख यांनी केले पाण्याची समस्या आहे ती लवकरच पूर्ण होणार असून अंतीम टप्प्यात असून भूमीपुजन लवकरच केला जाईल असा विश्वास यावेळी दिला. गेली कित्येकवर्ष मठाचीप्रतिक्षा सेवेकरी करीत होते. आजच्या काळातजागा दान करूनचव्हाण कुटुंबांनी मोठे योगदान दिलेअसून आमच्यामाध्यमातून मदत केली जाईल. या मठाकडे येणारा रस्त्यासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी विद्यमाननगरपंचायतीच्या माध्यमातून किंवा इतर निधीतून उपलब्ध केला जाईल. तालूक्याच्या विकास कामात सदैव हातात हात घालून सहकार्याची भूमीका असेल, असे उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांनी सांगीतले.

# दैनंदिन जीवनात सायकलीचा वापर

## वयाच्या ७४ वर्षीही शेकडो मैल प्रवास सुरळीत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दैनंदिन जिवनात विविध वाहतुकीच्या साधनांचा वापर वाढला आहे,की कोणत्याही ठिकाणी पोहचण्यासाठी अल्प वेळातच माणूस नियोजित वेळेवर पोहचत असतो.मात्र आज वेगवेगळ्या प्रकाराचे वहान असतांना ही सुद्धा त्याचा वापर न करता, खालापूर तालुक्यातील वानिवली येथिल असलेले सुदाम कोंडू थोरवे वय वर्षे ७४ असूनही विविध ठिकाणी जाण्यासाठी तसेच दैनंदिन जिवनात सायकलीचा वापर करीत आहे.यामुळे शारीरिक व्यायाम तसेच शरीर निरोगी राहण्यांस मदत होत आहे.असे मत यावेळी त्यांनी बोलताना व्यक्त केले.

गेली २५ ते ३० वर्ष सायकली वरुन प्रवास करीत असतांना शारीरिक व्यायम सोबत इंधनची बचत होत असल्याचे त्यांनी सांगितले.शिवाय सायकल म्हटली की मेन्टनेस कमी, त्याच बरोबर एखाद्या ठिकाणी जाण्यासाठी वेळ लागतो.मात्र प्रवास हा सुखकर असतो.पूर्वी वहाने अल्प प्रमाणात असल्यामुळे अनेक जण सायकलीने प्रवास किंवा बैलगाडी, पायी प्रवास केला जात होता.आता विविध



वाहतुकीची साधने आल्यामुळे सायकल मागे पडत चालली आहे.मात्र काही लोक सायकलीचा उपयोग व्यायाम व्हावे या दृष्टीकोणातून वापरतात.

सुदाम थोरवे तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी सायकलीचा वापर करतात. विशेष म्हणजे त्यांच्या मुलाचे सहकार्य सातत्याने लाभत आहे. आपण सायकलीने प्रवास केल्यांस त्यांस उत्तम आरोग्य लाभेल शिवाय इंधन टाकून वाहानामधून निघणाऱ्या वायू पर्यावरणात मिसळत असतो मात्र सायकल ही फक्त शारीरिक श्रमावर चालत असते.या मुळे आजपर्यंत माझी प्रकृती उत्तम असल्यांचे सुदाम थोरवे यांनी बोलतांना सांगितले.

# सडवलीतील महाआरोग्य शिबिरास रुग्णांचा प्रतिसाद

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील सडवली येथील नियोजित महाआरोग्य शिबिरासाठी सडवली ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील गांवे आणि परिसरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. केवळ ३ तासांच्या महाआरोग्य शिबिराला साधारणपणे ३०० हून अधिक रूग्णांची नोंदणी होऊन तपासणी झाली तर नेत्रतपासणीनंतर २०० रूग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले.



या महाआरोग्य शिबिराप्रसंगी पोलादपूर ग्रामीण रूग्णालयाच्या वैद्यकिय अधिक्षिका डॉ.भाग्यरेखा पाटील यांच्यासमवेत डॉ.दिव्या सोनावणे, अधिपरिचारिका स्वप्नाली गांधी, आयसीटीसी तंत्रज्ञ जाधव, परिचारिका अश्विनी चिपळूणकर, फेलोटोमीस्ट रेणुका उतेकर, लॅब असिस्टंट कुलकर्णी आणि रूग्णवाहिका चालक निकम आणि सकपाळ आदी ग्रामीण रूग्णालयाच्या आरोग्य कर्मचारीवृंद उपस्थित होता. चिंचवडच्या लोकमान्य टिळक हॉस्पिटलचे सीईओ डॉ.विशाल क्षीरसागर, फिजिशियन डॉ. निलेश आगवेकर, स्त्री रोग तज्ज्ञ डॉ.मोहिनी बेंद्रे, कानतज्ज्ञ डॉ.नागेश मगर व नेत्र तज्ज्ञ मासूम मलीक आदी वैद्यकीय तज्ज्ञ उपस्थित होते. या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली जनरल तपासणी, हृदयरोग तपासणी, ब्लड प्रेशर, डायबेटीस तपासणी, डोळे व कान तपासणी, अस्थिरोग तपासणी आणि मोफत औषधे तसेच चष्मे वाटप आदी उपक्रम राबविण्यात आले.

पोलादपूर तालुक्यातील सडवली येथील खोत भावकी गोकुळनगर सडवली येथे श्रीकुलस्वामीनी मंदिराचा वर्धापन दिन असल्याच्या निमित्ताने या महाआरोग्य शिबिराचे आयोजन मिशन फॉर व्हिजन फाऊंडेशन पुणे, लोकमान्य टिळक हॉस्पिटल चिंचवड तसेच ग्रामीण रूग्णालय पोलादपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विठ्ठल रुक्मीणी मंदिर सभागृहामध्ये करण्यात आले. सडवली येथील खोत भावकी गोकुळनगरमध्ये सकाळी श्रीसत्यनारायणाची महापूजा झाल्यानंतर महाआरोग्य शिबिर तर त्यानंतर महिलांसाठी हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले.

या महाआरोग्य शिबिरानिमित्त महाड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवनिर्वाचित संचालिका सुगंधा बापू जाधव यांचा विशेष सत्कार आयोजित करण्यात आला तर स्व.बाळशास्त्री जांभेकर दर्पण पुरस्कार विजेते ग्रामीण पत्रकार शैलेश पालकर तसेच आपलं पोलादपूर साप्ताहिकाचे संपादक भगवान साळवी यांचा यावेळी खोत भावकीकडून शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी मिशन फॉर व्हिजन फाऊंडेशन पुणेचे संस्थापक अध्यक्ष सहदेव गोळे, भरत जाधव, पांडुरंग जाधव, विजय जाधव,मंगेश जाधव, उदय जाधव, राम जाधव, बाळाराम जाधव, हरिश्चंद्र जाधव, कल्पेश मांढरे, निलेश जाधव, चंद्रकांत राम जाधव, दिनकर जाधव, हरिश्चंद्र भागोजी जाधव, शुभम जाधव, शंकर मांढरे, तुषार जाधव, अभिजीत जाधव, किरण जाधव, नितेश जाधव, पंकज जाधव, निलेश जाधव, सचिन जाधव, ज्ञानेश्वर जाधव, गोविंद बुवा जाधव, लक्ष्मण जाधव, शंकर जाधव, सुशांत जाधव, अथर्व जाधव, सर्वेश जाधव, गगन जाधव, चंद्रकांत जाधव आदींनी धार्मिक, आरोग्य विषयक तसेच सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महत्वपूर्ण सहकार्य केले.

# उरणच्या चित्रकाराचे जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये प्रदर्शन

**उरण : बातमीदार**

येथील नामवंत चित्रकलाकार रुपेश पाटील व त्यांचे सहकारी कुमार गायकवाड, लक्ष्मीनारायण शर्मा, मकरंद जोशी, ममता शर्मा, वैभव गायकवाड, श्रेयस खानविलकर, कल्पना सोनी, राजू आतडे, चेतन वैती या कलाकारांनी एकत्र येत २ ते ८ मेदरम्यान जहागीर आर्ट गॅलरी येथे द स्पेक्ट्रम ऑफ कलर्स २०२३ कला प्रदर्शन भरविले आहे.

प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी बॉम्बे आर्ट सोसायटीचे प्रेसिडेंट राजेंद्र पाटील, अभिनेत्री सुकन्या मोने, डायरेक्टर अंकुर काकटकर, अभिनेता अमीर तळवलकर, सुचित्रा गोसावी, गायक देवेंद्र पाटील, सामाजिक



कार्यकर्ते रमेश पेडणेकर, धिरेंद्र ठाकूर आदी उपस्थित होते. या मान्यवरांनी पहिल्याच दिवशी कला प्रदर्शनाला भेट देऊन कला प्रदर्शनाचे, कलाकारांच्या कार्याचे कौतुक केले. मुंबईमधील जहागीर आर्ट गॅलरीत देश, विदेशातील प्रसिद्ध नामवंत असे कलाकारांचे प्रदर्शन भरत असते. अशा या जहागीर आर्ट गॅलरीत भारतीय कलाकारांनी भरविलेल्या चित्रकला प्रदर्शनाला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात भेट देऊन या कला प्रदर्शनाचा आनंद घेतला. हे प्रदर्शन सोमवार (दि. ८)पर्यंत रसिकांना सकाळी ११ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत विनामूल्य पाहता येईल.

पान १ वरुन

### तळोजा फेज १ मधील नागरिकांना मिळणार मुबलक पाणी

त्यामुळे शहरात जादा दाबाने पाणीपुरवठा होणार असल्याची माहिती सिडकोचे पाणीपुरवठा अधिकारी चेतन देवरे यांनी दिली. तळोजा फेज १, २ या ठिकाणची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. सिडकोला त्या दृष्टीने नियोजन करावे लागणार आहे. आम्ही याबाबतदेखील पाठपुरावा करीत असल्याची प्रतिक्रिया माजी नगरसेवक हरेश केणी यांनी या संदर्भात बोलताना दिली.

# कर्नाळा अभयारण्यात वन्यजीवांची गणना

## प्राणीप्रेमी रात्रभर पाणवठ्यावर बसून टिपणार प्राण्यांच्या हालचाली

**खारघर : प्रतिनिधी**

पनवेलसारख्या निर्माण होत असलेल्या सिमेंटच्या जंगलाजवळ असलेल्या कर्नाळा अभयारण्यामध्ये वाढलेल्या मानवी हस्तक्षेपाचा प्राण्यांच्या संख्येवर काही परिणाम झाला आहे का, गेल्या वर्षभरात वन्यप्राण्यांची संख्या वाढली की कमी झाली. मी अभयारण्यात नवीन कोणता प्राणी दाखल झाला आहे का? या सर्वांची उत्तरे लवकरच मिळणार आहेत. शुक्रवारी (दि.५) बुद्धपौर्णिमेच्या निमित्ताने प्राणीगणनेला सुरुवात झाली आहे.

वन विभागातर्फे दरवर्षी बुद्धपौर्णिमेच्या दिवशी वन्य प्राण्यांची गणना केली जाते. यंदा ५ मे रोजी ही गणना सुरू झाली असून प्राणिप्रेमी रात्रभर पाणवठ्यावर बसून प्राण्यांच्या हालचाली टिपणार आहेत. याकरिता वनविभागासोबत वन्यजीवांसाठी काम करणाऱ्या संस्था एकत्रितपणे ५ आणि ६ रात्रीच्या वेळेला प्राण्यांच्या हालचाली टिपल्या. याकरिता कर्नाळा अभयारण्यात तीन मचाण आणि ट्रॅक कॅमेरे बसविन्यात आले. २० पेक्षा जास्त जणांचे पथक प्राण्यांची गणना करणार आहे.

पनवेलपासून अवघ्या काही कि.मी. अंतरावर असलेल्या कर्नाळा अभयारण्याला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. मोठ्या प्रमाणात पर्यटक या ठिकाणी भेट देत असतात. लाखो पर्यटक दरवर्षी या अभयारण्याला भेट देत असतात. सुमारे १२.१५५ चौरस किलोमीटरच्या परिसरात हे अभयारण्य वसले आहे. स्थानिक तसेच स्थलांतरित १४७ प्रजातीचे पक्षी या ठिकाणी आहेत. यामध्ये ३७ प्रकारचे पक्षी हे स्थलांतरित पक्षी आहेत. विविध प्रकारच्या हिंस्र प्राण्यांचाही या ठिकाणी अधिवास आहे. बिबटे,डुक्कर,रान मांजर,भेकर,खवल्या मांजर आदी याठिकाणी यापूर्वी पाहिले गेले आहेत. या प्राण्यांच्या सध्याची स्थिती काय आहे?याबाबत माहिती मिळणार आहे. पाणथळ्या शेजारी वनविभागाने निवडलेले कर्मचारी या भागावर लक्ष ठेवून असणार आहेत. काही ठिकाणी ट्रॅक कॅमे-यांचीदेखील याकरिता मदत घेतली जाणार आहे.

संस्थेचे स्वयंसेवक व कर्नाळा अभयारण्यातील वनविभागाचे कर्मचारी या गणनेसाठी प्राण्यांवर लक्ष ठेवून राहणार असल्याची माहिती कर्नाळा अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी नारायण राठोड यांनी दिली. कर्नाळा अभयारण्यातील एक गार्ड, एक सुरक्षा रक्षक आणि संस्थेचे सदस्य एकत्रित रात्रभर पाणवठ्याजवळ उभारल्या मचाणवर बसून ही गणना करणार आहेत.

कर्नाळा अभयारण्यात तीन मचाण उभारले असुन याठिकाणी बसुन हि गणना पार पडणार आहे. आपटा परिसर, मयूर रेस्ट हाऊस आणि डॉरमेन्ट्री या पाणवठ्याच्या ठिकाणी हि गणना पार पडणार आहे. याकरिता आधुनिक ट्रॅक कॅमेरे याठिकाणी लावले जाणार आहेत.



## निवडक

### डोक्यात फरशी पडून कामगाराचा मृत्यू

**पनवेल :** काम करत असताना डोक्यात फरशी पडून एका कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना कळंबोली येथील मार्बल मार्केटमध्ये घडली आहे. कळंबोली येथील मार्बल मार्केटमध्ये काम करीत असताना परशुराम पासवान या कामगाराच्या डोक्यावर फरशी पडल्याने तो गंभीर जखमी झाला होता. अखेर उपचारदरम्यान मृत्यू झाला. त्यामुळे काम करताना कामगारांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. ही घटना कळताच कळंबोली मार्बल मार्केटमधील कामगारांनी काम बंद आंदोलन पुकारले आणि सुरक्षा साधने आणि सोयी उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली.

### उसर्ली खुर्द येथून माय-लेक बेपत्ता


**पनवेल :** उसर्ली खुर्द येथे आपल्या राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता आईसह चार वर्षीय मुलगा



कोठेतरी निघून गेल्याने ते हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. दर्शना गोरख जाधव असे या महिलेचे नाव असून तिचे वय २९ वर्षे, उंची ५.४ इंच, रंग गोरा, नाक सरळ, चेहरा-उभट, बांधा मध्यम, कपाळावर टिकली, केस काळे मध्यम, अंगात नेसून पंजाबी ड्रेस, पायात चप्पल घातलेली आहे. ही आपल्या चार वर्षीय मुलगा शिवांश ज्याची उंची २.५ इंच, रंग गोरा, नाक सरळ, चेहरा उभट, बांधा मध्यम, केस काळे मध्यम, अंगात नेसून थ्री फोर- टीशर्ट, पायात शूज असे पेहराव असलेल्या मुलाबरोबर कोठेतरी निघून गेल्याने ते हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. यांच्याबाबत कोणास काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार नवले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पनवेलमधून विवाहित महिला बेपत्ता

**पनवेल :** घरकामासाठी बाहेर जाते असे सांगून बाहेर पडलेली विवाहित महिला बेपत्ता झाल्याची घटना शहरात



घडली आहे. तुलशी प्रेम बोगटी असे या बेपत्ता महिलेचे नाव असून तिचे वय २९ वर्षे, उंची पाच फुट, बांधा मजबूत, केस काळे, नाक सरळ, अंगात ड्रेस नेसून आहे. तिला नेपाळी व हिंदी भाषा बोलता येते. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३) किंवा पोलीस हवालदार संदीप नवले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### खुटारीमध्ये घरातून मोबाईलची चोरी

**पनवेल :** तालुक्यातील खुटारी येथे अज्ञात चोरटयाने उघड्या दरवाजावाटे आत प्रवेश करून मोबाईल चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रिक्षाचालक शाहरुख मोहम्मद इरसाद खान (वय २५) ह्याच्या खुटारी येथील राहत्या घरी अज्ञात चोरट्याने पहाटेच्या सुमारास उघड्या दरवाजावाटे आत प्रवेश करून १० हजार रुपये किमतीचा ओपो एफ११ प्रो कंपनीचा मोबाईल आणि ८०० रुपये किमतीचा फायर बोल्ट लिंझा ३ स्मार्ट वॉच चोरून नेला. याप्रकरणी शाहरुख यांनी तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

# पनवेलमध्ये रस्ता कामाला सुरुवात

## रहिवाशांसह प्रवाशांनी मानले भाजपचे आभार





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल तालुका उपाध्यक्ष व बुथ कमिटी ४२८चे अध्यक्ष रावसाहेब खरात यांच्या यांच्या पाठपुराव्याने रस्त्याच्या थांबलेल्या कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे येथील रहिवाशी व प्रवाश्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

बरेच वर्षांपासून प्रभाग क्रमांक १७ मधील नर्मदा कॉम्प्लेक्स पाण्याच्या हौदापासून पनवेल रेल्वे स्टेशनला जाणारा रस्ता पूर्णपणे खराब झाला होता. रस्त्यावर मोठ मोठे खड्डे व पाण्याच्या हौदामध्ये पाणी फिल्टर केल्यानंतर गढूळ पाणी एका मोठ्या पाईप लाईन द्वारे सोडले जाते, परंतू त्या पाईप लाईनमध्ये गाळ व माती साठल्यामुळे पाणी फिल्टर केल्यानंतर भिंतीतून बाहेर रस्त्यावर यायचे. पाण्यामुळे रस्त्यावरचे खड्डे दिसत नसल्यामुळे बरेच वेळा अपघात घडले. खराब झालेल्या रस्त्यामुळे स्थानिक रहिवासी आणि रेल्वेने येणाऱ्या जाणाऱ्या प्रवासी त्रस्त झाले होते.

माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या मार्गदर्शनाखाली रावसाहेब खरात यांनी पनवेल महापालिकेकडे पाठपुरावा करून खराब झालेला रस्ता डांबरीकरण करण्यात आले. स्थानिक रहिवाशांनी आणि रेल्वे प्रवाशांकडून आभार मानले.





**उलवे नोड :** भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली सेक्टर १७ येथे भाजप उरण विधानसभा मतदार नोंदणी मोहीम राबविण्यात आली. वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, अवधेश कुमार महतो, अविनाश सिंग, मनोज मौर्य, दिपा मौर्य, भरत गुप्ता यांनी हा मतदान नोंदणी कॅम्प आयोजित केला होता. त्याचा अनेक नागरिकांनी लाभ घेतला.



**पनवेल :** पनवेल को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्री येथील हेरिटेज मोटर्स या शोरूममध्ये टाटा नेक्सन ई व्ही मॅक्स डार्क एडिशन या इलेक्ट्रिक गाडीचे अनावरण भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे तसेच सुनील पाटील, ॲड. मनोहर पाटील, सीओ महेश परब, जनरल मॅनेजर सचिन सावंत, असिस्टंट मॅनेजर पवन जाधव, दीनदयाळ सिंह आदी उपस्थित होते.





**पनवेल :** महापालिकेच्या माजी उपमहापौर सीताताई पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते सदानंद पाटील, खांदा कॉलनी सरचिटणीस भीमराव पोवार, मिथुन दर्गे, तन्मय सावंत, हरिदास वणवे, अमित बोरकर, राजू महापुरकर, अशोक सावंत, तुकाराम गावकर, सचिन नागटिळक, चेतन जाधव, देवीदास खेडकर, संकेत गायकवाड आदी उपस्थित होते. दरम्यान, वाढदिवसानिमित्त सीताताई पाटील यांच्यामार्फत सील आश्रमामध्ये अन्नदान करण्यात आले.

## रूचिता लोंढे यांच्यातर्फे 'द केरला स्टोरी'चा मोफत शो

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका रूचिता लोंढे यांनीही आपल्या वाढदिवसानिमित्त १५ मे रोजी १८ वर्षावरील महिलांकरीता 'द केरला स्टोरी' या चित्रपटाच्या मोफत शोचे आयोजन केले आहे.

देवभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या केरळमधील सत्य घटनेवर आधारित, महिलांच्या सन्मानावर आघात करणारा, वास्तवावर प्रकाश टाकणारा 'द केरला स्टोरी' सिनेमा शुक्रवारी (दि. ५) सिनेमागृहात प्रदर्शित झाला आहे. या घटनेची माहिती सर्व महिलांना पोहचावी तसेच महिला सक्षमीकरणासाठी महिलांनी तो पाहावा यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका रूचिता मुग्धा गुरुनाथ लोंढे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त पनवेल शहरातील महिलांसाठी पनवेल शहरातील ओरिअन मॉल येथील पीव्हीआर सिनेमा येथे १५ मे रोजी सकाळी १०.३० वाजता १८ वर्षावरील महिलांकरीता 'द केरला स्टोरी' या चित्रपटाच्या मोफत शोचे आयोजन केले आहे.

या शोचे तिकीट मर्यादित असून मोफत तिकिटासाठी ९६०७०५२४५४ ह्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन माजी नगरसेविका रूचिता लोंढे यांनी केले आहे.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



**पनवेल :** बहुजनांसाठी शिक्षण, जातिभेद निर्मूलन आणि स्त्रीमुक्तीसाठी कायदे करणारे राजर्षी छत्रपती साहू महाराज यांची शनिवारी पुण्यतिथी होती. त्यानिमित्त मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात शाहू महाराजांच्या प्रतिमेस भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी के. सी. पाटील, मोतीलाल कोळी, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, सावळे उपसरपंच सुनील माळी आदी उपस्थित होते. (छाया : विकास म्हात्रे)



**पनवेल :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज पुण्यतिथीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य योगिता कदम, प्रा. हिमांशू मोरे, रवनिश बेकटर, सागर देवघरे, राघव शर्मा, गोस्वामी मॅडम, अपरजित मॅडम, भाग्यश्री मॅडम यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

### जासई विद्यालयात छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्य जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची पुण्यतिथी करण्यात आली. शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष आणि भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री कामगार नेते सुरेश पाटील यांनी विद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या राजश्री शाहू महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

विद्यालयाचे प्राचार्य संस्थेचे लाइफ वर्कर अरुण घाग, उपमुख्याध्यापिका एस. एस. पाटील, पर्यवेक्षिका एस. सी. पाटील, रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख, प्रा. अतुल पाटील, म्हात्रे, शेडगे, काळे, संदीप गाताडी यांनीही महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण केले. या वेळी सर्व सेवकांनी व विद्यार्थ्यांनी १०० सेकंद स्तब्धता पाळून अभिवादन केले.





### गव्हाण विद्यालयात राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बहुजनोद्धारक, आरक्षणाचे जनक लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दी वर्ष पूर्तीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.

प्रारंभी विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे यांचे हस्ते लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमा पूजन करण्यात आले.

या वेळी विद्यार्थी विद्यार्थ्यांनींनी राजर्षी लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर आधारित भाषण केले. संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर यांनीही लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग सांगून त्यांच्या कार्याचा आढावा घेतला.

या वेळी प्राचार्या साधना डोईफोडे यांच्यासह विद्यालयाचे उपप्राचार्य प्रमोद मंडले, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते,रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे यांचे सह सर्व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सांस्कृतिक विभागाच्या सहायक हर्षाला पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.


।। श्री गजानन प्रसन्न।।

**पुण्यतिथी समारंभ**


आपणांस कळविण्यात येत आहे की, आमच्या येथे सालाबादप्रमाणे स्वर्गीय जनार्दन आत्माराम भगत साहेबांचा ३९वा पुण्यतिथी समारंभ मिती वैशाख कृ.२, शके १९४५, रविवार, ०७/०५/२०२३ रोजी सकाळी ९ वाजता लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर आणि आमदार मा. श्री. प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत होणार आहे. तरी आपण कार्यक्रमास अगत्य येण्याचे करावे, ही विनंती.


**आपले नम्र**

श्री. प्रकाश जनार्दन भगत
श्री. अजय जनार्दन भगत
श्री. संजय जनार्दन भगत

**ठिकाण**

भगत साहेब निवासस्थान,
मु. शेलघर, पो. गव्हाण,
ता. पनवेल, जि. रायगड



# सूडनायक पन्नास वर्षांचा झाला...

**रोल रोल पे लिखा होता है करनेवाले का नाम...**

**'जंजीर'चा इन्स्पेक्टर विजय खन्ना देव आनंदच्या नशिबात नव्हता ते बरेच झाले. तुम्हा आम्हा पब्लिकचे नशीब दांडगे होते म्हणायचे. देवसाहेब स्वतःच्या प्रतिमेच्या, रूपाच्या, लोकप्रियतेच्या प्रेमात, त्याला रुपेरी पडद्यावर गाणं गायची हौस मौज, पण विजय संपूर्ण पिक्चरभर हसत नाही. कायम अंतर्मुख आहे. मनात मां-बाप के खून का बदला घेण्याची तीव्र धुसफूस आहे. तो गाईल कसा? देव आनंदला ही भूमिका जमली असती की नाही माहीत नाही. शोभली अथवा पाहवली नक्कीच नसती.**

### झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

राजकुमारला रोल आवडला, पण दिग्दर्शक प्रकाश मेहराच्या केसाला लावलेल्या तेलाचा वास आवडला नाही म्हणून नाही म्हटलं अशी एक दंतकथा प्रसिद्ध आहे. (गंमत म्हणजे, कालांतराने याच प्रकाश मेहरा यांच्या 'इन्सानियत के दुश्मन' आणि 'मुहब्बत का फैसला'मध्ये जानी राजकुमारने भूमिका साकारली तेव्हा बहुतेक मेहराने तेलाचा ब्रॅण्ड बदलला असावा अथवा राजकुमारच्या नाकाला आता काही प्रॉब्लेम नसावा.) राजकुमार त्या दिवसांत चेन्नईत (तेव्हाचे मद्रास) शूटिंग करीत असल्याने त्याने मेहरांना सुचवले तिकडे शूटिंग करूयात, पण ही गोष्ट मुंबईत घडते, मग काय करणार?

धर्मेंद्र एकाच वेळेस अनेक चित्रपटांत बिझी होता म्हणून त्याला 'जंजीर'कडे दुर्लक्ष करावे लागले. 'जंजीर'चे पटकथेचे हक्क त्याच्याकडेच होते. तोच या चित्रपटाची निर्मिती करणार होता. मेहरांच्या 'समाधी'त भूमिका साकारत असतानाच धर्मेंद्रने मेहरांना 'जंजीर'चे हक्क दिले आणि मेहरांनी कामाला सुरुवात केली. सलिम जावेद यांची बंदिस्त पटकथा व धारदार संवाद मेहरांच्या हाती येताच या जोडीने मेहरांना अट घातली. पिक्चरच्या पोस्टर, होर्डिंग्ज, बुकलेटस यात आपल्याला क्रेडिट हवं. 'हाथी मेरे साथी', 'अधिकार', 'अंदाज', 'सीता और गीता' या सुपरहिट चित्रपटांच्या पटकथेने त्यांच्या नावाला वलय आणि वजन यायला हवे होते, पण त्यांचे नाव पडद्यावरच राहिले. पब्लिसिटीत नव्हते. पिक्चरवाल्यांचे जग फोकसमध्ये चमकत असलेल्याकडे जास्त पाहते. तो फंडा महत्त्वाचा. तात्पर्य, सलिम जावेदचा नावाचा आग्रह (की हट्ट) अगदी सही होता.

आता मेहराना 'परफेक्ट हीरो' हवा होता. जावेद अख्तरने दिलीपकुमारलाही ही स्क्रिप्ट ऐकवली आणि त्याने आपल्या स्वभावानुसार 'तारीफ पे तारीफ' केली, पण होकार दिला नाही. (दिलीपकुमारलाही 'जंजीर'साठी विचारले हे जावेद अख्तर मुलाखतीत सांगतात तेव्हा समजते. अन्यथा इतकी वर्ष हा संदर्भ/संबंध माहित नव्हता.) अशातच एकदा सलिम खानने एस. रामनाथन दिग्दर्शित 'बॉम्बे टू गोवा' (१९७२) पाहिला आणि त्यातील अमिताभची ढिश्यूम ढिश्यूम मारधाड पाहताना त्यांना वाटले हाच हीरो 'जंजीर 'ला परफेक्ट आहे. त्यांनी व प्राणनेही ते मेहरांना सांगताच तेही 'बॉम्बे टू गोवा' पहायला थिएटरात गेले आणि त्यांच्यातील दिग्दर्शकाला 'इन्स्पेक्टर विजय खन्ना' सापडला.

या घडामोडी होत असतानाच मुमताजने आपण लवकरच लग्न करतेय, असे म्हणत 'जंजीर' सोडला. मेहरांनी 'समाधी'तील दोन नायिकांपैकी जया भादुरीला 'चाकू सुरया तेज चलाओ'साठी निवडले. तोपर्यंत 'एक नजर', 'बन्सी बिरजू'त एकत्र काम करताना ती व अमिताभ मनाने खूप जवळ आले होते. 'जंजीर'साठी अमिताभचा विचार करावा असे जयानेही मेहराना सुचवल्याचा किस्सा प्रसिद्ध आहे. पिक्चर हिट असले की त्याच्या अनेक गोष्टी चर्चेच्या ठरतात त्या या अशा.

...'जंजीर' (रिलीज ११ मे १९७३) पडद्यावर येईपर्यंत एक नवीन वादळ (चक्रीवादळच) जन्माला येतेय असा फिल्म इंडस्ट्रीतील ट्रेण्ड पंडितानाही अंदाज नव्हता आणि त्यातच खरी गंमत असते. फर्स्ट डे फर्स्ट शोचा पब्लिक रिपोर्ट म्हणजे पिक्चरची कुंडली स्पष्ट. 'जंजीर' रिलीज होईपर्यंत अमिताभच्या खात्यात बरेच फ्लॉप आणि 'आनंद'मधील अभिनयाचे कौतुक (अर्थात राजेश खन्नाचे जास्त होते) व 'बॉम्बे टू गोवा'चे यश (त्यातही मेहमूद जास्त भाव खाऊन गेला). एवढ्याशा भांडवलावर 'जंजीर' फार फार तर चार आठवडे चालायला हवा होता. पण आज पन्नास वर्ष होऊनही चालतोच आहे. एकदा का पब्लिकने ठरवले अमूक पिक्चर डोक्यात फिट्ट करायचा आणि डोक्यावर घ्यायचा की तो निर्णय अंतिम.

'जंजीर' सुपरहिट ठरल्यावर अनेक स्टोरीज बाहेर आल्या. पोस्टरवर आपले नाव नसल्याचे पाहून सलिम जावेदने एका रंगारीला पैसे देऊन ऑपेरा हाऊस ते जुहू परिसरातील 'जंजीर'च्या पोस्टरवर नाव रंगवे. ते कुठे हे सांगितले नसल्याने अमिताभच्या हातावर तर कुठे प्राणच्या चेहऱ्यावर, कुठे अजितच्या पिस्तूलवर ते रंगवले गेले.

सेठ धरम दयाल तेजा साकारताना आपण अगदी थंड डोक्याने आणि एकाच पट्टीत बोलतोय असं दाखवूया हे अजितने सुचवलेले मेहरांनी मानले आणि ते पब्लिकला आवडले. सलिम खानने अजितला इंदौरला नेऊन एका डॉनची भेट घडवून दिली. स्वतः सलिम इंदौरचाच होता. प्राणने यारी है इमान मेरा हे गाणेच साकारायला नकार दिला होता. मेहरांनी त्याची समजूत घातली आणि हेच गाणे लोकप्रिय ठरले. गुलशन बावरा यांच्या गीतांना कल्याणजी आनंदजीचे संगीत. दीवाने है दीवाने को गाणे पडद्यावर गुलशन बावरानेच शीला वाझसोबत साकारलंय.



पिक्चरचे मध्यवर्ती कथासूत्र फार ग्रेट वगैरे नाही. त्या काळात ते भारी होते आणि लहान मोठ्या व्यक्तिरेखांचा परफॉर्म, प्रभावी पटकथा, टाळीबाज डायलॉग आणि यारी है इमान मेरा यार मेरी जिंदगी या कव्वालीची लोकप्रियता यावर पिक्चर भारी ठरलं. हे ठरवून होत नसते. असं केले तर तसे होईल, असं दाखवलं तर ते हिट होईल अशी सुपरहिट पिक्चरची हुकमी रेसिपी नसतेच. ते घडत जाते आणि पब्लिकला पचलं तर मग अशा पिक्चरला कोणीच थांबवू शकत नाही.

लहानपणी आपल्या आई-पित्याची निर्घृण हत्या करणाऱ्या तेजाचा बदला मोठेपणी पोलीस इन्स्पेक्टर विजय घेतो याभोवती अनेक लहान मोठ्या व्यक्तिरेखांसह पिक्चर रंगतो. अर्थात, मध्यवर्ती थीमशी त्या भूमिका जोडल्या गेल्या असल्याने आपण गुंतत जातो. माला (जया भादुरी), शेरखान (प्राण), डीसिल्वा (ओम प्रकाश), मोना (बिंदू), गंगू (केश्तो मुखर्जी) वगैरे वगैरे.

डायलॉगने हमखास टाळ्या शिट्ट्या वसूल केल्या. जब तक बैठने को ना कहा जाए शराफत से खडे रहो, यह पुलीस स्टेशन है तुम्हारे बाप का घर नही या संवादाने अमिताभला नवीन ओळख मिळाली. त्याच्या रूपेरी जोशला छप्पर फाड रिस्पॉन्स मिळाला. आज के बाद अपने आदमीयोंसे कह दो की हमेशा तुम्हारे नजदीक रहे...क्यों कि तुम्हारी नजदीक की नजर कमजोर है...

आज जिंदगी मे पहेली बार शेरखान की शेर से टक्कर हुई... मला आठवतंय, माझ्या शालेय वयात राजेश खन्नाची जबरदस्त क्रेझ असतानाच्या दिवसांतच 'जंजीर' आला (नेमकं सांगायचं तर 'दाग' २७ एप्रिलला रिलीज झाल्यावर दोनच आठवड्यांनी 'जंजीर' आला), पण त्याने इतिहास घडवला. हिंदी चित्रपटसृष्टीला तडफदार अॅन्ग्री यंग मॅन अर्थात तडाखेबंद सूडनायक दिला. यश हेच चलनी नाणे या फिल्मी नियमानुसार अमिताभ बच्चन नावाचे पर्व सुरू झाले ते कायमचेच! पब्लिक, मीडिया आणि फिल्म इंडस्ट्रीत अचानक अमिताभ महत्त्वाचा ठरला. तोपर्यंत संथ वेगाने निर्मितीवस्थेत असलेल्या 'बेनाम'च्या शूटिंगला दिग्दर्शक नरेंद्र बेदीने वेग दिला.

...जंजीर मॅटीनी शो, रिपिट रनला रिलीज होत होता आणि नव्वदच्या दशकात एके दिवशी बातमी आली. चित्रपट वितरक गुलशन रॉय यांनी 'जंजीर'चे हक्क घेतले असून त्याच्यावर आधुनिक तांत्रिक सोपस्कार करून तो सिनेमास्कोप करण्यात आला आहे. माहिमच्या 'बादल'मध्ये ही तांत्रिक करामत पहायला गेल्यावर निराश झालो. मूळ चित्रपट खालून वरून कापला असल्याने त्याचा प्रभाव बोथट झाला होता. चित्रपट व अमिताभची उंची यात मावणारी शोभणारी नव्हतीच. मूळ पस्तीस एमएमचा 'जंजीर' पाहणे हाच यावरचा उपाय होता. अशा सर्वकालीन चित्रपटाची रिमेक स्वाभाविक गोष्ट. तेलगू व तमिळ भाषेत १९७४ साली, तर १९८० साली मल्याळम भाषेत रिमेक झाली. हिंदीत (२०१३) रिमेक बनताना वाद झाला. सलिम जावेद याविरुद्ध कोर्टात गेले. आता प्रकाश मेहरा हयात नसल्याने मुलाने ही केस लढवली. अखेर कोर्टाबाहेर 'मांडवली' होत सलिम जावेदना दोन कोटी मानधन मिळाले. मूळ चित्रपटासाठी त्यांना पंचावन्न हजार रुपये मानधन मिळाले होते. पन्नास वर्षांपूर्वी या पंचावन्न हजाराची 'किंमत' किती असेल? 'जंजीर'च्या वेळचा प्रेक्षक, तेव्हाचं जगणं, तेव्हाचा चित्रपट, तेव्हाचे सामाजिक सांस्कृतिक वातावरण आणि आता रिमेकच्या वेळची स्थिती यात फरक होता ही मूलभूत गोष्ट का लक्षात येत नाही?

'जंजीर'च्या यशावर फोकस टाकताना मला वाटतं, ओ. पी. रल्हन दिग्दर्शित 'फूल और पत्थर' (१९६५)पासूनच निधड्या वृत्तीचा हीरो पब्लिकला आवडायला लागला होता. सोबर धर्मेंद्र आता ही मॅन ठरत होता. मेरे हमदम मेरे दोस्त, फर्ज, द ट्रेन, यकीन, आमने सामने अशी पब्लिकला अॅक्शन हळूहळू आवडत होती. पण अॅक्शन हीरोला एस्टॅब्लिश होण्यासाठी 'जंजीर'चा योग आला. आतापर्यंत हिंदी चित्रपटातील फायटिंग एक तर क्लायमॅक्सला असायची आणि तीही लुटूपुटूची अथवा दारासिंग, रंधवा यांच्या स्टंटपटात असे. त्याला प्रतिष्ठा नसे. ते अंतर 'जंजीर'ने कमी केले. फायटिंगलाही अॅक्टींग लागते यावर शिक्कामोर्तब झाले. सगळेच चित्रपट येतात व जातात (काही आवडले जातात तर बरेचसे नावडते. त्याचे सर्व हक्क प्रेक्षकांच्या स्वाधीन).

...सत्तरच्या दशकाच्या मध्यास महागाई, टंचाई, बेरोजगारी, साठेबाजी, रेशनवर रॉकेलसाठी रांग याने समाज त्रस्त झाला होता आणि या सगळ्याला रुपेरी पडद्यावरील अमिताभ जणू वाट मोकळी करुन देत होता. त्यास पन्नास वर्ष झाली कधी हे समजलेच नाही. सर्व काही कालपरवा घडलं असेच वाटतेय.

# कर्मयोगी

**आयुष्य झिजवून आपले**
**परिसराचे सोने केले,**
**प्रयत्नाने अन कष्टाने**
**सुखाचे जिणे दिले,**
**मातीच्या कणाकणातून**
**किर्तीचा सुगंध येतो,**
**चरणावरी तुमच्या**
**आजही माथा विनम्र होतो...**

आज कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते, थोर समाजसुधारक दिवंगत जनार्दन आत्माराम भगतसाहेबांची ३५वी पुण्यतिथी. त्यानिमित्ताने आपण पनवेल तालुक्यात २५ ग्रामपंचायतींमध्ये स्वच्छता अभियान राबविले. समाजात स्वच्छतेबाबत जनजागृती करणे हा त्यामागचा उद्दात हेतू होता. संत गाडगेबाबांच्या प्रेरणेतून भगतसाहेबांनी स्वच्छतेचे कार्य हाती घेतले होते. हे त्या काळात खऱ्या अर्थाने जनजागृतीचा आधार ठरला. गोष्ट आहे जवळपास १९५३ची. नेहमीप्रमाणे श्रावण महिन्यात आजोबांनी उभारलेल्या विठ्ठल मंदिरात हरिनाम सप्ताहाची पूर्वतयारी चालू होती. सर्व लोक मंदिराकडे चालले होते. मंदिराकडे जाणारा रस्ता चिखलाने व बाजूला शौचविधी केलेला होता. तेवढ्यात पुजारींचे आगमन झाले. ते पूजेस सुरुवात करणार तेवढ्यात माझे आबा (वडील) अर्थात भगतसाहेबांनी त्यांना विचारले, स्वच्छता महत्त्वाची की पूजा? पुजारी गडबडले. भगतसाहेबांचे सहकारी काय समजायचे ते समजले आणि त्यांनी सर्व रस्ता साफ करून टाकला. मग सात दिवस हरिनाम सप्ताह आणि परिसर स्वच्छताही झाली. त्या काळी खेडेगावात सार्वजनिक स्वच्छता नसायची. त्यामुळे रोगराई पसरायची व लोक मांत्रिकाकडे जात. त्यामुळे मृत्यूचे प्रमाण वाढत असे. ती अंधश्रद्धा दूर करण्याचे कामही भगतसाहेबांनी केले.

स्वच्छता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यातून अंधश्रद्धेचे उच्चाटन याच्या खऱ्या शिकवणुकीतून समाज घडतो हे भगतसाहेबांनी लोकांच्या मनात रूजविले. म्हणजे विज्ञाननिष्ठ मानवतावाद त्यांनी दिला. आपण विज्ञाननिष्ठ असतो तेव्हा कृतीप्रवण असतो हे त्यांनी ते आचरणात आणले. विज्ञानाचे प्रत्यक्षनिष्ठ व प्रयोगनिष्ठ नियम आज मनुष्य जातीस ज्ञात झालेले आहेत. तोच आजचा खरा सनातन धर्म आहे.

भगतसाहेब म्हणत की, अद्ययावत व्हा. विज्ञाननिष्ठ जगात गेल्याशिवाय तुम्हाला किंमत राहणार नाही. आजच काय ते सांगा, बुद्धीला शरण जा. बुद्धीनिष्ठ व्हा हाच त्याच्यामागचा हेतू. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार हा सर्व समाजाला व्हावा व अज्ञानाची रोगट साथ जी फैलावली जात आहे ती हटवून त्यांनासुद्धा विज्ञानाच्या शुद्ध वातावरणात नेणे हे बुद्धिवाद्यांचे काम आहे, कारण गावामध्ये कोणत्याही बाजूला रोगांनी पछाडले तर गावचे आरोग्य धोक्यात येते. त्यामुळे अंधश्रद्धा जिथे दिसेल तिथल्या तिथे ती ठेचून काढली पाहिजे, असे त्यांना वाटत असे. म्हणूनच स्वच्छतेची कास धरा व वैज्ञानिक दृष्टिकोन आचरणात आणा, असे ते नेहमी सांगत.



आज आपण मोठ्या प्रमाणात हे आचरणात आणले. त्यामुळे महाराष्ट्रच नाही; तर भारतामध्ये आपल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने स्वच्छतेचा पुरस्कार मिळवला. हीच खरी भगतसाहेबांना आदरांजली आहे.

## शिक्षणाचा प्रसार

भगतसाहेबांनी सामाजिक बांधिलकीच्या ध्यासाने जनसेवेचे व्रत हाती घेतले होते. शिक्षण हे समाजसुधारकाचे साधन आहे. म्हणून शिकण्याची संधी सगळ्यांना मिळाली पाहिजे अशी अंतरिक तळमळ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. शिक्षणाची विचारधारा परिसरातील मुलांना दिल्याशिवाय समाजाचा विकास साधता येणार नाही या जाणिवेतून त्यांनी शिक्षणाचे कार्य हाती घेतले. १९६३मध्ये गव्हाण कोपर येथे रयत शिक्षण संस्थेचे हायस्कूल त्यांनी सुरू केले व शिक्षणाची ज्ञानगंगा घराघरात पोहचविण्याचे कार्य केले.

'स्वतः घडा व दुसऱ्यांनाही घडवा' हा संदेश आज भगतसाहेबांचे जावई माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आचरणात आणून 'विद्या विनयेन शोभते' या ब्रीदवाक्याचा दीप हाती घेऊन समाजातील सर्व घटकांच्या शैक्षणिक उन्नतीच्या कार्यास सुरुवात केली. मर्यादित क्षेत्रात अमर्यादित काम करा या प्रमाणे त्यांचे अमर्यादित कार्य अविरत चालू आहे.

## शांतिदुताची भूमिका

पूर्वी लग्नसमारंभात भांडण-तंटे होत. भगतसाहेब स्वतः नवरदेव असताना त्यांच्या लग्नात झालेल्या भांडणाचा फार मोठा प्रसंग उद्भवला होता, जो त्यांना आयुष्यभर जागतं ठेवण्यास कारणीभूत ठरला. नशापान व जुने रितीरिवाज या गोष्टी भांडणास कारणीभूत होत असत. त्यांच्या लग्नात झालेल्या भांडणामुळे ते अशी भांडणे पुढे कुणाच्याही लग्नकार्यात होऊ नये म्हणून प्रयत्नशील राहिले तसेच भांडणे झाल्यास त्यांनी ती मिटविली व समाजात शांतता प्रस्थापित केली. नंतर त्यांची ख्याती वाढत गेली. आपले आजोबा अंबाजी भगत जसे पंचक्रोशीत पंच म्हणून काम करायचे तसे आबा ८४ गावांत भांडणे मिटविण्यासाठी मुख्य पंच म्हणून काम करायचे. अशा प्रकारे त्यांनी गावागावातील भांडणे मिटवून शांतिदुताचे काम केले.

## मदतीचा हात

भगतसाहेबांचे जीवनच आता दुसऱ्यांना आधार देणारे, मदतीला धावून जाण्याचे बनले होते. १९६० साली खाडीगावातील बाह्यकाठ फुटल्याने ती जमीन ओसाड झाली. त्यामुळे मासळीचे व शेतीचे उत्पन्न एकदम शून्य झाले होते. आता त्यांना स्थलांतर हा एकच उपाय होता. स्थलांतरित लोकांसाठी देशमुखांनी जमीन दिली. बहुसंख्यांचे स्थलांतर त्या जमिनीवर करण्यात आले. हे सर्व कार्य आबांमुळे घडले व त्या गावाचे नाव शिवाजीनगर पडले. तेथील गावची मंडळी उद्योग-धंद्यासाठी परिसरात जाऊ लागली. आबांनी त्यांना सहकार्य केले व जमीन मिळवून देणे, पाण्याची सोय करणे, त्यांचे संरक्षण हेही आबांनी केले. या विभागाचे भाग्य असे की एक शिक्षणप्रेमी, दानशूर या गावी जन्माला आला ते म्हणजे रामशेठ ठाकूर. ते म्हणतात, मानवी जीवनाला सागराची उपमा दिली आहे व द्रष्ट्या माणसाला दीपस्तंभ म्हटले आहे. मला आरंभापासून दीर्घकाळ मार्गदर्शन करणारे एक द्रष्टे नेतृत्व लाभले ते म्हणजे भगतसाहेब.


आबांच्या अपुऱ्या राहिलेल्या शैक्षणिक कार्याची निवड लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केली. त्यामागे हीच जाणीव होती की समाजाचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास करावयाचा असेल तर शिक्षण हेच एकमेव औषध आहे. या भावनेतून त्यांनी आज स्व. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाचे कार्य अविरतपणे चालू ठेवले आहे.

आज पुण्यतिथीच्या निमित्ताने आबांबद्दल भावना आणि विचार मला समाजातील अनेक घटकांपर्यंत एकाच वेळी पोहचविता आल्याचा आनंद वाटतो. आबा अर्थात स्व. जनार्दन भगत यांच्या नावाने सुरू असलेला हा शिक्षणयज्ञ लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली धगधगत ठेवण्याचे कार्य आपण सर्वजण करीत आहात. त्यात माझा नेहमीच सक्रिय सहभाग राहील.

**काळ पुसू शकणार नाही**
**तुमच्या कार्याच्या आठवणी,**
**मार्ग दाखवत राहिल**
**तुमचे चरित्र क्षणोक्षणी,**
**तुमची सेवा व तुमचा त्याग**
**स्मरत राहतो मनोमन,**
**निस्वार्थी सेवेस तुमच्या**
**आमचे विनम्र अभिवादन!**

**-संजय भगत, संचालक,**
**जनार्दन भगत शिक्षण**
**प्रसारक संस्था, पनवेल**

# गुरुदेव रवींद्रनाथ टागोर



रवींद्रनाथ ठाकूर यांचा जन्म ७ मे १८६१ साली झाला होता. यांना गुरुदेव असे ही संबोधले जाते. रवींद्रनाथ टागोर एक ब्राह्मोपंथीय, चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगीतकार होते. ते त्याच्या आई वडिलांचे १३ वे अपत्य होते. लहानपणापासूनच त्यांना 'रबी' असे संबोधले जात असे. कोलकात्याच्या पिराली ब्राह्मण कुटुंबात जन्म झालेल्या रवीन्द्रनाथांनी वयाच्या ८ व्या वर्षी पहिली कविता लिहिली. वयाच्या १६ व्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपणनावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांग्लादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी यांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात एक आमूलाग्र बदल घडून आला. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियातील पहिले नोबेलविजेते होते. आपल्या आयुष्यात त्यांनी एक हजार कविता, आठ कादंबऱ्या, आठ कथा संग्रह आणि विविध विषयांवर अनेक लेख लिहिले. एवढेच नव्हे तर रवींद्रनाथ टागोर हे संगीतप्रेमी होते आणि त्यांनी त्यांच्या जीवनात २००० पेक्षा जास्त गाणी रचली. त्यांनी लिहिलेली दोन गाणी म्हणजे आज भारत आणि बांगलादेशचे राष्ट्रगीत.

आयुष्याच्या ५१ वर्षांपर्यंत त्यांच्या सर्व कर्तृत्त्वे आणि यश फक्त कोलकता आणि आसपासच्या क्षेत्रात मर्यादित राहिले. वयाच्या ५१ व्या वर्षी ते आपल्या मुलासह इंग्लंडला जात होते. भारत व इंग्लंडला समुद्री मार्गाने जाताना त्यांनी गीतांजली या त्यांच्या काव्यसंग्रहाचे इंग्रजी भाषांतर करण्यास सुरवात केली. गीतांजली अनुवाद करण्यामागे त्यांचा कोणताचं हेतू नव्हता, फक्त प्रवासात वेळ घालविण्यासाठी काहीतरी करण्याच्या उद्देशाने त्यांनी गीतांजलीचे भाषांतर करण्यास सुरवात केली. त्याने एका नोटबुकमध्ये हाताने गीतांजलीचे इंग्रजीमध्ये भाषांतर केले.

लंडनमध्ये जहाजातून उतरताना त्याचा मुलगा नोटबुक ठेवलेला सूटकेस विसरला. ही ऐतिहासिक कृती सुटकेसमध्ये बंद राहण्यासाठी नव्हती. ज्याला तो सूटकेस मिळाला त्या व्यक्तीने दुसर्याच दिवशी रवींद्रनाथ टागोरांकडे ती सुटकेस दिली.

लंडनमधील टागोरचा इंग्रज मित्र असलेल्या चित्रकार रोथेन्स्टाईन यांना हे समजले की गीतांजलीचे भाषांतर रवींद्रनाथ टागोर यांनीच केले होते आणि त्यांनी ते वाचण्याची इच्छा व्यक्त केली. गीतांजली वाचल्यानंतर रोथेन्स्टाईन मुग्ध झाले आणि त्यांनी आपल्या मित्र डब्ल्यू.बी. यांनी गीतांजलीबद्दल सांगितले आणि वाचण्यासाठी नोटबुक दिली. त्यानंतर जे घडले ते इतिहास आहे. येट्सने स्वतः गीतांजलीच्या इंग्रजीच्या मूळ आवृत्तीची प्रस्तावना लिहिली. सप्टेंबर १९१२मध्ये भारत सोसायटीच्या सहकार्याने गीतांजलीच्या इंग्रजी भाषेच्या काही मर्यादित प्रती प्रकाशित झाल्या. लंडनच्या साहित्यिक वर्तुळात या पुस्तकाचे चांगले कौतुक झाले. लवकरच, गीतांजलीच्या शब्दाच्या नादांनी संपूर्ण जगाला सम्मोहित केले. पाश्चात्य जगाने प्रथमच भारतीय मनीषाची झलक पाहिली. गीतांजली प्रकाशित झाल्यानंतर एका वर्षानंतर रवींद्रनाथ टागोर यांना १९१३मध्ये नोबेल पारितोषिक देण्यात आले.

**(साभार : मराठीवेबदुनिया)**

# साथ दिल्यास कोकण ज्ञानपीठचे नंदनवन करू

## कर्जतमध्ये प्रसाद थोरवे यांचे प्रतिपादन; शिक्षकांशी साधला संवाद

**कर्जत : प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांपासून कोकण ज्ञानपीठ संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाची परिस्थिती नाजूक झाली आहे. तसेच फार्मसी महाविद्यालय चांगल्याप्रकारे सुरू असताना त्यामध्येही खूप अडचणी निर्माण झाल्या आहेत. आत्ता आम्ही येथे आलो आहोत. त्यामुळे सर्व अडचणी आपण सर्व मिळून सोडवू. तुम्ही मनापासून साथ दिल्यास कोकण ज्ञानपीठचे नंदनवन करू.' असा शब्द कोंकण ज्ञानपीठ संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष प्रसाद थोरवे यांनी दिला.



कर्जत तालुक्यात कोकण ज्ञानपीठ संस्थेचे अभियांत्रिकी महाविद्यालय आर्थिक विवंचनेत अडकल्यामुळे अनेक महिने येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन मिळत नव्हते. त्याचा परिणाम राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयावर सुद्धा झाला व तेथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही पाच- सहा महिने वेतन मिळाले नाही. त्यामुळे ही महाविद्यालये बंद होतात की काय? अशी भीती त्या संस्थेत काम करणाऱ्यांना होती. सध्या संस्था चालवणाऱ्या पदाधिकाऱ्यांना ही संस्था नीट चालवता येत नाही. अशी तक्रार मुंबई धर्मादाय आयुक्तांकडे २०२१ मध्ये करण्यात आली होती. तिचा निकाल २८ एप्रिल २०२३ रोजी लागून संस्थेवर काम करणाऱ्या अध्यक्षांसह सातही सदस्यांना पाय उतार करून त्याजागी नवीन संचालकांची नियुक्ती आदेशाद्वारे धर्मादाय आयुक्तांनी केली.

या नियुक्तीमधील प्रसाद मनोहर थोरवे हे संस्थेचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. ते आमदार महेंद्र थोरवे यांचे पुतणे आहेत. त्यांच्यासह आदित्य ज्ञानेश्वर गुरव, सुवर्ण अभिषेक सुर्वे, दिगंबर रामचंद्र देशमुख, डी. एस. गोसावी, किशोर चव्हाण, डी. एस. वाघ यांची संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीनंतर नवनियुक्त संचालकांपैकी प्रसाद थोरवे यांच्या समवेत अभिषेक सुर्वे, नगसेवक संकेत भासे, चंद्रशेखर सर यांनी कोंकण ज्ञानपीठच्या प्रशासकीय कार्यालयात जाऊन मागील कार्यकारिणीतील उपाध्यक्ष शिशिर धारकर, खजिनदार प्रदीपचंद्र श्रृंगारपुरे, सदस्य झुलकर नैन डाभिया यांच्याशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी वातावरण एकदम तणाव ग्रस्त झाले होते. सहाय्यक पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे यांनी तेथील परिस्थिती हाताळली. त्यामुळे वातावरण शांत झाले.

प्रसाद थोरवे, संकेत भासे, अभिषेक सुर्वे व चंद्रशेखर सर यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास पिल्लेवान आणि फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन काळे यांच्याशी चर्चा करून दोन्ही महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. डॉ. मोहन काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात महाविद्यालयाची सद्यस्थिती कथन केली. त्यानंतर सुर्वे यांनी, 'संस्थेचे बाबत घडले ते एखाद्या सिनेमा सारखे तुम्हाला वाटले असेल पण ते सत्य आहे आणि नियमानुसार व कायदेशीर आहे. आम्ही आता ही संस्था नावारूपास आणण्याचा प्रयत्न करू. तुमच्या अडचणी आम्हाला सांगा. त्या टप्प्या टप्प्याने सोडविण्याचा आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करू असे सांगितले.

चंद्रशेखर सर यांनी ही संस्था निश्चित नावारूपास येईल कारण आता संस्थेचे संचालक युवक आहेत. त्यांच्यात संस्थेसाठी काहीही करण्याची धमक आहे.' असे सांगितले. सूत्रसंचालन प्रा. तनिष्का ठाकरे तर आभार प्रदर्शन प्रा. अमोल बोराडे यांनी मानले.

**प्रत्यक्ष करून दाखवणे हा आमचा स्वभाव**

**संकेत भासे म्हणाले, आमची जरी राजकीय पार्श्वभूमी असली तरी आम्ही आमचे राजकारणातील कपडे बाहेर ठेवून काम करणार आहोत. आपण कोकण ज्ञानपीठमध्ये 'केजी ते पीजी' असे शिक्षण देण्याचा तुमच्या सर्वांच्या सहकार्याने प्रयत्न करू. आम्ही जास्त काही बोलत नाही तर प्रत्यक्ष करून दाखवणे हा आमचा स्वभाव आहे, असे स्पष्ट केले.**

## पाणोसेकोंड येथून सुमारे १२ हजारांची सागवान लाकडे जप्त

**माणगांव : रामप्रहर वृत्त**




माणगांव तालुक्यातील साळवे ग्रामपंचायत हद्दीत असणाऱ्या पाणोसे कोंड गावच्या हद्दीत अवैध वृक्ष तोड (सागवान वृक्ष)होत असल्याची व साठा करून वाहतूक होत असल्याची माहिती गोपनीय सूत्रांकडून प्रमोद जाधव यांना १ मे रोजी मिळाली. तात्काळ कोणत्याही प्रकारचा विलंब न करता ही माहिती जाधव यांनी वनरक्षक अक्षय मोरे व वनरक्षक वैशाली भोर यांना कळविली .

प्रत्यक्षदर्शी पाणोसे कोंड या गावी माणगांव वनखात्याचे अधिकारी पोहचले असता त्या ठिकाणी वन खात्याचा वाहतुकीचा पास व लाकडावर शिक्के असलेले सागवान तसेच बिन शिक्क्याची सागवान लाकडे देखील १ मे रोजी पाणोसे कोंड येथील बाळकृष्ण महादेव पांचाळ यांच्या गुरांच्या गोठयाजवळ आढळून आली. ही लाकडे अवैधरित्या वाहतूक करून आणली असल्याचे माणगांव वनविभागाकडून पत्रकारांना सांगण्यात आले आहे. या सागवान लाकडांमध्ये ३१ नग साग,१.१७८ घनमीटर अंदाजे रक्कम ११,५४४ इतकी आहे. या संदर्भात माणगांव वनविभागाकडून पाणोसे कोंड येथील बाळकृष्ण महादेव पांचाळ यांच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

कारवाई माणगांवचे वनक्षेत्रपाल अनिरुद्ध ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल डी. एस. सुभेदार, उतेखोल वनरक्षक अक्षय मोरे, माणगांव वनरक्षक वैशाली भोर यांच्या उपस्थितीत केली. यावरून असे दृष्टीक्षेपात येत आहे की,माणगांव तालुक्यात लाकूड माफियांकडून होत असलेल्या सागवान व इतर नगदी लाकडांच्या तस्करीवर व अवैध वाहतूकिवर माणगांव वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांची नजर आहे.

## रानमेव्याच्या खरेदीची लगबग

### ओले काजूगरांचा हंगाम सरतोय; किमती वाढल्या



**पाली : प्रतिनिधी**

ओल्या काजूगराचा हंगाम आता संपत चालला आहे. त्यामुळे काजूगर अल्प प्रमाणात विक्रीसाठी येत आहेत. शिवाय मागील महिन्याच्या तुलनेत किंमती देखील वाढल्या आहेत. १५ दिवसांपूर्वी १०० ते १५० रुपये शेकड्याने मिळणारे काजूगर आता २०० ते २५० रुपये शेकड्याने भेटत आहेत. किंमत वधारली असली तरी हंगाम सरत चालला असल्याने पाली सुधागडसह जिल्ह्यात काजूगर खरेदीसाठी खवय्ये लगबग करत आहेत.

खराब हवामान यामुळे यंदा काजू व आंबा पिकावर परिणाम झाला आहे. उत्पादन घटले आहे. आदिवासी महिला हा मेवा विकायला घेवून येतात. सध्या भाव चांगला मिळत असल्याने आनंदी आहेत. माणगाव, श्रीवर्धन, म्हसळा आदी ठिकाणी काजूगर शेकड्याने मिळतात. तर पाली, रोहा, पेण आदी ठिकाणी अर्धे काजूगर वाट्यावर मिळतात. १० रुपयांनी मिळणार वाटा आता २० रुपयाने मिळत आहे. भाव जास्त असला तरी खवय्ये मात्र चढ्या भावाने देखिल काजूगर खरेदी करत आहेत.

**अनोखी शक्कल**

फळ धारणा होण्याआधी आलेल्या बी मधून काजूगर काढला जातो. त्यानंतर फळ मोठे झाल्यावर बी परिपक्व होते. आणि ओल्या काजुगराचा हंगाम संपतो. मात्र काहीजण या परिपक्व बिया पाण्याच्या मोठ्या पिंपात भिजवून ठेवतात व त्यातील गर काढून ओले काजूगर असल्याचे सांगून विकतात. ओले काजूगर आणि परिपक्व झालेल्या काजूच्या बियांमधील गराच्या चवीत खूप फरक असतो.

**असे बनवतात काजूगराचे चविष्ट पदार्थ**

चविष्ट ओले काजूगर वेगवेगळ्या प्रकारे खाल्या जातात. कजुगराचा रस्सा किंवा सुकी भाजी करुन खाल्ली जाते. पुलाव व बिर्याणी देखील केली जाते. तसेच मटन, मच्छी, व सुक्या मासळी मध्ये टाकुन सुद्धा काजूगर खाल्ले जातात. असे हे काजूगर जेवणाची लज्जत वाढवितात.

**काजू बिया काढण्यासाठी मेहनत व हातांची दूरवस्था**

**दुर्गम, डोंगराळ भागात आणि जंगलात काजुच्या बिया काढण्यासाठी जावे लागते. आदिवासी बांधव अनवाणी उन्हातान्हात बिया काढण्यासाठी जातात. या बियांना मोठ्या प्रमाणात चिक असतो. आदिवासी महिला व बांधव या बियांमधून काजूगर काढतांना हातात मोजे घालत नाही किंवा कोणतीही सुरक्षितता घेत नाही. त्यामुळे त्यांचे हात व बोटे चिकामुळे पुर्णपणे खराब होतात. काही जण राख लावतात पण त्याने काही फरक पडत नाही. शासनाकडून त्यांना हातमोजे देणे तसेच सहाय्य करणे गरजेचे आहे, असे सुधागडातील आदिवासी समाज नेते रमेश पवार यांनी सांगितले.**

## शिव आधार फाउंडेशनच्या विविध कार्यक्रमांना प्रतिसाद

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा येथे शिव आधार फाउंडेशनच्या वतीने १ मेचे औचित्य साधून विविध कार्यक्रम घेण्यात आले. १ मे रोजी सत्यनारायणाची महापूजा रोहा येथील राम मारुती चौकात आयोजित करण्यात आली होती. शेकडोच्या संख्येने दिवसभरात भाविकांनी दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घेतला. सकाळी श्री सत्यनारायणाची विधिवत पूजा सुभाष शुक्ल यांच्या हस्ते करण्यात आली. संध्याकाळी सखी भजन मंडळ रोहाच्या वतीने सुश्राव्य भजन सादर करण्यात आले.



यावेळी श्रीमती फडके आदी भजनी मंडळीच्यावतीने भजन सेवा करण्यात आली. दिवसभरात रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर, माजी नगरसेवक समीर सकपाळ, महेंद्र गुजर, अजित मोरे, मनोज घोसाळकर, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, उत्तमराव मोरे, यज्ञनेश भांड, मकरंद जोशी, महादेव साळवी, निलेश शेडगे, उद्धव आव्हाड इत्यादी राजकीय, सामाजिक व कंपनी क्षेत्रातील मान्यवरानी भेट दिली.

या वेळी शिव आधार फाउंडेशनचे अध्यक्ष नारायण खुळे, सेक्रेटरी निकेश पोकळे, संतोष सातपुते, संजय गायकवाड, सुरेश मोरे, विश्वजित लूमन,प्रशांत तांबट, बाळू गुजर, राकेश नलावडे, जगदीश म्हशीटे,राकेश मोहिते,भारत मोहिते, निलेश पाटणकर, मुकेश राऊत, भरत ठाकरे आदी शिव आधार फाउंडेशनचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## जिते येथील दोन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**पेण : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या वतीने आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळावी, या उद्देशाने एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते. सन २०२२-२३ या वर्षासाठी पेण तालुक्यातील बालगंगा विद्यामंदिर चुनाभट्टी जिते या शाळेतील आठवीतील दोन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षासाठी एन.एम.एम.एस. या स्पर्धा परीक्षेमध्ये बालगंगा विद्यामंदिर चुनाभट्टी जिते येथील एकूण ४ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. यामध्ये अजिंक्य निवृत्ती माळी व रूषांक वसंत म्हात्रे हे दोन विद्यार्थी पात्र झाले असून त्यांना शासनाकडून प्रत्येकी ६० हजार रुपये शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. शाळेचे शिक्षक संदेश मोकल यांच्या कडून सदर दोन्ही विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन लाभले. शिष्यवृत्ती प्राप्त झालेल्या या दोन्ही विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, सर्व विद्यार्थी, जिते सरपंच, उपसरपंच, सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य व चुनाभट्टी जिते परिसरातील ग्रामस्थांकडून अभिनंदन होत आहे.

## शिक्षक संघाकडून गुणवंत शिक्षकांचा सन्मान

**मुरुड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या रायगड शाखेने जिल्ह्यातील गुणवंत शिक्षकांचा सन्मान सोहळा आयोजित केला होता. अखिल महाराष्ट्रातील शिक्षकांचे आधारवड शिवाजीराव पाटील यांच्या जयंतीदिनाच्या औचित्याने आयोजिलेला हा दिमाखदार सोहळा येथील भाग्यलक्ष्मी हॉलच्या सभागृहात झाला. शिवाजीराव पाटील हे सर्वांना अण्णा म्हणून परिचित असून त्यांनी विधानसभेच्या व्यासपीठावर शिक्षकांचे विविध प्रश्न मांडून आजवर लाखो शिक्षकांना योग्य न्याय मिळवून दिला आहे. शिक्षक आमदार म्हणून त्यांची झंझावाती कारकीर्द राज्यातील तमाम शिक्षकांच्या स्मरणात आहे. यातून काही प्रमाणात उतराई होण्याच्या भावनेतून रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक संघटना अध्यक्ष राजेंद्र म्हात्रे, जिल्हा चिटणीस जीवन तेलंगे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने जिल्ह्यातील गुणवान शिक्षकांचा गुणगौरव करुन अण्णांना आदरांजली वाहण्यात आली .



यावेळी विश्वास पाटील अलिबाग, संजय झिराडकर मुरुड, सुधीर शेळके रोहा, पारधी सर -श्रीवर्धन, जगदीश गुंड-पनवेल, विलास पाटील-पेण, मंगला कुथे -माणगांव, मनिषाआंजर्लेकर-अलिबाग यांच्यासह अनेकांना शाल, श्रीफळ, मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

प्राथमिक शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष केशवराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन अलिबाग तालुका शिक्षक संघाचे अध्यक्ष प्रमोद भोपी आणि त्यांच्या अलिबाग टिमने केले.

## महाडच्या परांजपे हायस्कूलचे ५० वर्षांपूर्वीचे विद्यार्थी आजोबा होऊन भेटले एकत्र!

**म्हसळा : प्रतिनिधी**

एसएससी (१९७१) मधील महाड वि. ह. परांजपे हायस्कूलचे तब्बल ५० वर्षांपूर्वीचे मित्र २९-३० एप्रिल रोजी महाडमध्ये हायस्कूल समोर एकत्र भेटले. सर्वानी ऐकमेकाना भेटत मिठ्या मारल्या. रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्यांनाही कुतुहल वाटेल असेच वातावरण होते. जमलेल्या मित्रांनी सांस्कृतिक प्रथेनुसार प्रथम ग्रामदैवत असलेल्या विरेश्वर मंदीराला भेट देवून दर्शन घेतले. मंदीराचे विश्वस्त दिपक वारंगे, रमेश नाटेकर, संजय पवार व अन्य ट्रस्टीनी सर्वांचे स्वागत केले.




महाड व्यतीरीक्त अन्य भागांतून येणारी आणि स्थानिक वर्ग मित्र सायंकाळी ५ वाजता नाते येथील सुधाकर मांडवकर यांचे हॉटेल अंगणमधील प्रांगणात बघता-बघता २०-२२ जण आपापल्या वर्गमित्राला घेऊन हजर झाले. त्यामध्ये स्थानिक, पनवेल, पुणे म्हसळा, तळा भागात वास्तव्यास असलेले विद्यार्थी होते.

पुणे येथे राहणारा सुधीर गद्रे याच्या मनात आले त्यानी दिपक कोटीया, संजय खांबेटे, महाडमधील नंदू शेठ, अविनाश टक्के, विनायक खोडके यांचे जवळ संकल्पना मांडली आणि एसएससी १९७१ या नावे व्हाटसअॅप गृप बनवला आणि ५० वर्षापूर्वीचे चांदे क्रीडांगणात खेळणारे विद्यार्थी आता आजोबाच्या भूमिकेत एकत्रित मिठ्या मारत जमले आणि गेट टुगेदरचा कार्यक्रम यशस्वी केला. या वेळी शरद जोशी, नंदू मेहता, नितीन दोशी, शेखर वाडकर, सुशील कद्रू निरंजन गुप्ते, कुमार मेहता, संतोष वारंगे, माधव मुंदडा, दिलीप देव, दिपक देसाई, प्रशांत शेट, मारुती कदम, राजन आर्ते, सुधीर जाधव व अन्य मित्रांचे संर्पक मिळविले आणि कामच फत्ते झाले.

यावेळी निधन पावलेल्या शिक्षक आणि विद्यार्थी मित्राना श्रध्दांजली अर्पण केली. ग्रुपमध्ये नोंद झालेले ३० मित्र होते त्यापैकी १५ व्यापारी, ११ अशासकीय सेवेत, ४ शासकीय सेवेत होते. बहुतांश मित्रांची मुले सुध्दा, लंडन, मिशिगन बेल्जियम, जर्मनी, दुबई, कुवेत, आफ्रिका अशा देशांतून नोकरीसाठी आहेत. ५ दशकानंतर आमचे चेहरे एकमेकांसाठी अनोळखी झाले होते.

**मानपत्राने गौरव**

***दिलीप देव यांनी गरीबीत शिकून सामाजिक भावनेंतून ६५ वेळा केलेले रक्तदान, लातूरला भूकंप काळात जाऊन मदतकार्यात घेतलेला सक्रीय सहभाग, स्वताला झालेला कॅन्सर सारख्या व्याधीवर मात करून पनवेलला दहा वर्ष पटवर्धन हॉस्पिटल येथे विना मोबदला रुग्णसेवेचे केलेले कार्य त्याबद्दल मानपत्र देऊन मित्रांनी केलेला सत्कार सर्वांच्याच स्मरणात रहाणार आहे.***

## खोपोली तालुक्यातील भंगाराच्या खोपटी बनताहेत गुन्हेगारी केंद्र

■ अनधिकृत खोपट्यांना आश्रय कोणाचा?

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यात भंगार साठवणूक करणारी खोपटी संख्या दिवसेंदिवस वाढत असून खोपट्यांमधून लाखोच्या उलाढाली होत असून परप्रांतीयाचा वावर मोठ्या प्रमाणात होत आहे.



तालुक्यात शंभरपेक्षा अधिक असलेली भंगाराच्या खोपटी आहे. काही लोकवस्तीनजीक तर काही भंगार खोपटी कारखाना, ढाबे याना खेटून आहेत. विशेष म्हणजे बहुतांश भंगार व्यवसाय अनधिकृतपणे आणि अनधिकृत जागेत सुरू आहेत.

नवी मुंबईला खेटून असलेला खालापूर तालुका पाताळगंगा औद्योगिक वसाहत, साजगाव ढेकू, सावरोली लघु औद्योगिक वसाहत,खोपोली तसेच खालापूर परिसरातील कारखानदारीमुळे सुबत्ता राखून आहे. या कारखान्यात दररोज शेकडो अवजड वाहनातून मालाची वाहतूक केली जाते. पोलाद वाहतूक करणारे ट्रेलर, तेल वाहतूक करणारे टँकर याचा भरणा मोठ्या प्रमाणात असतो. अनधिकृतपणे तेल, रसायन साठा केला जात असून लोखंडाची देखील मोठ्या प्रमाणात साठा भंगार व्यावसायिकांकडे केला जातो. कारखान्यातून निघणारा टाकाऊ, आरोग्यास हानिकारक माल कोणत्याही प्रकारची सुरक्षा आणि खबरदारी न घेता साठवणूक करणारे अनेक भंगार व्यावसायिक खालापुरात जागोजागी आहेत. याशिवाय या परिसरात कारखान्यात होणाऱ्या चोरीची विल्हेवाटदेखील काही भंगार दुकानावर राजरोसपणे होत आहे.


**मे. मुजावर मॅडम**

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात...**

क्रिमीनल चौ. अर्ज. क्र. ४३६/२०२३

**सौ. सुलोचना लहू भोईर ....अर्जदार**

**विरूध्द**

**मे. ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत खेरणे, पनवेल**
**ता. पनवेल जिल्हा रायगड ....सामनेवाला**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार यांची आई **कै. बेमटीबाई बळीराम माळी** यांचे दिनांक ०२/०३/१९९२ रोजी मौजे खेरणे, ता. पनवेल जिल्हा रायगड येथे निधन झाले आहे. त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत खेरणे व पंचायत समिती पनवेल सदरी नसल्यामुळे संबंधीत पंचायत समिती व ग्रामपंचायत यांनी तसे दाखले अर्जदार यांस दिले आहेत. त्यामुळे अर्जदार यांनी पनवेल येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयामध्ये मयत **कै. बेमटीबाई बळीराम माळी** हे दिनांक ०२/०३/१९९२ रोजी मयत झाले असल्याचे घोषीत करून मिळणेकामी व तशी नोंद ग्रामपंचायत सदरी व पंचायत समिती सदरी दाखल होवुन मृत्यु नोंदींचा दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपास करण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारां मार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता दिनांक ०६/०६/२०२३ पर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर राहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास कै. बेमटीबाई बळीराम माळी हे दिनांक ०२/०३/१९९२ रोजी मयत झाले आहेत असे गृहीत धरून दाखला देण्यात येईल.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०६/०५/२०२३

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पनवेल**

# नवी मुंबईत पावसाळापूर्व तयारी

## ■ पालिका प्रशासनाकडून होल्डींग पाँड व पंप हाऊसची पाहणी



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहर समुद्र सपाटीपासून खालच्या पातळीवर वसलेले असल्याने सिडकोने शहर निर्मिती करताना भरतीचे पाणी काही काळापुरते साठवून ठेवण्यासाठी धारण तलाव (होल्डींग पाँड) निर्माण केलेले आहेत. पावसाळ्यात पाणी साचून राहू नये म्हणून महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी शहर अभियंता संजय देसाई यांच्यासह सेक्टर १२ सीबीडी बेलापूर तसेच सेक्टर ८ वाशी येथील होल्डींग पाँडना त्याचप्रमाणे तेथे असलेल्या पंप हाऊसला भेटी देऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली.

या वेळी अतिरिक्त शहर अभियंता शिरीष आरदवाड, कार्यकारी अभियंता अरविंद शिंदे, अजय संख्ये, सुनील लाड आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. सीबीडी बेलापूर व वाशी या दोन्ही ठिकाणी होल्डींग पाँड परिसराची पाहणी करताना खारफुटीला बाधा न पोहचता व सीआरझेडच्या नियमांचे उल्लंघन न करता यांत्रिकी पध्दतीने शक्य होईल तेवढा गाळ काढून होल्डींग पाँडची पाणी साठवण क्षमता थोड्याफार प्रमाणात का होईना वाढविण्याच्या दृष्टीने तत्पर कार्यवाही करावी असे निर्देश आयुक्तांनी या वेळी दिले.

### ‘नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्या’

*पावसाळ्यामध्ये कुठेही पाणी साचणार नाही याची आत्ताच खबरदारी घेऊन आवश्यक उपाययोजना त्वरित करून घ्याव्यात आणि पावसाळी कालावधीत नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची आगाऊ दक्षता घ्यावी असेही निर्देश आयुक्त राजेश नार्वेकर यांनी या पाहणी दौऱ्यात अभियांत्रिकी विभागास दिले.*

त्यासोबतच एमसीझेडएकडून गाळ काढण्याची परवानगी प्राप्त करण्याचा पाठपुरावा सुरू ठेवावा, असेही आयुक्तांनी सूचित केले.

पंप हाऊसचे काम करण्यासाठी उच्च न्यायालयाची परवानगी मिळविण्याची प्रक्रिया पावसाळी कालावधीत पूर्ण करून घ्यावी व पावसाळ्यानंतर लगेचच दोन्ही पंप हाऊसची बांधकामे सुरू करावीत, असेही आयुक्तांनी या वेळी निर्देश दिले. पावसाळी कालावधीत विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास जनरेटरची पर्यायी व्यवस्था कार्यान्वित ठेवावी तसेच पावसाळी कालावधीत सर्व पंप सुरू राहतील याकडे काटेकोर लक्ष द्यावे आणि पर्यायी पंपांची व्यवस्था करावी, असेही आयुक्तांनी निर्देश दिले.

# मालमत्ता कर न भरणाऱ्या लघुउद्योजकांवर उद्यापासून कारवाईचा बडगा -आयुक्त

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महापालिकेच्या स्थापनेपासून मालमत्ता कर न भरणाऱ्या ४२४ लघुउद्योजकांवर मालमत्ता कर विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे. या थकबाकीदारांना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सोमवारपासून नोटीसा बजावण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिली. करवसुलीसाठी प्रसंगी न्यायालयाच्या निर्देशानुसार त्यांच्या मालमत्ताही सील करण्याची कारवाई करण्यात येईल, असेही यांनी सांगितले.

नवी मुंबई महापालिका थेट ग्रामपंचायतीतून निर्माण झाली. त्यानंतर मालमत्ता कराची अवास्तव आकारणी केल्याचा आरोप करत लोकप्रतिनिधींनीनी आंदोलन केले होते. परिणामी काही प्रमाणात कर अल्प झाला. त्यामुळे आपणही आंदोलन केले, तर आपलाही फायदा होईल, असा अपसमज बेलापूर पट्टीतील उद्योजकांना झाला. त्यांनीही आपण औद्योगिक क्षेत्रात असल्याने महापालिकेने लागू केलेला मालमत्ता कर भरणार नसल्याचे सांगत आंदोलन केले. नंतर महापालिका औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधा देत नसल्याचा दावा करत मालमत्ता कर भरण्यास नकार देत न्यायालयात याचिका प्रविष्ट केली. उच्च न्यायालयातून सर्वोच्च न्यायालयापर्यंत हे प्रकरण गेले. अखेर मागील महिन्यात न्यायालयाने सर्व थकबाकीदार लघुउद्योजकांनी मालमत्ता कर भरला नाही, तर पुढील सुनावणी घेणार नाही, असे स्पष्ट केले. तसेच कर वसुलीसाठी त्यांच्या मालमत्ता सील करण्याचेही आदेश दिले आहेत.

महापालिका क्षेत्रात अनुमाने एक हजार ६५० लघुउद्योजक असून त्यापैकी मालमत्ता कराची मूळ रक्कम भरणारे ५९७आहेत. नियमितपणे कर भरणारे ४९७ जण असून त्यांच्याकडून सुमारे नऊ कोटी ५० लाख रुपयांचा कर प्राप्त झाला आहे. तसेच अद्यापपर्यंत एकदाही मालमत्ता कर न भरणारे ४२४ लघुउद्योजक आहेत. या थकबाकीदारांकडून अनुमाने १५० कोटी रुपयांहून अधिक रक्कम पालिकेला येणे आहे.

# कुकशेत गाव होणार कचराकुंडीमुक्त!

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या माध्यमातून कचराकुंडीमुक्त शहर अभियान राबविण्यात येत आहे. त्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे, मात्र अनेक ठिकाणी नागरिक या आवाहनाला दाद देत नसल्याचे दिसून येत आहे. यत्नेरुल विभागातील कुकशेत ग्रामस्थांनी मात्र नवी मुंबईकरांसमोर आदर्श ठेवत कचरा कुंडी मुक्त कुकशेत गाव करण्याचा निश्चय केला आहे. यासाठी मजी नगरसेवक सुरज पाटील यांनी ग्रामस्थांना आवाहन करत जनजागृतीस सुरुवात केली असून त्यास प्रतिसाद मिळत आहे.

कुकशेत गावात पालिकेच्या घनकचरा विभागाच्या माध्यमातून ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात आले. याबाबत सर्वच नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी, यासाठी महिलांनी रैली काढली होती. पालिकेच्या माध्यमातून कचराकुंडीमुक्त शहर करण्यासाठी मागील काही वर्षांपासून सुरुवात केली आहे. शहरातील सेक्टर भागातील जवळपास सर्वच ठिकाणच्या कचराकुंड्या हटविण्यात आल्या आहेत.

कचऱ्यासाठी नागरिकांना घंटागाडीची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. कुकशेत गावदेखील कचराकुंडीमुक्त व्हावे, यासाठी माजी नगरसेवक सूरज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी पुढाकार घेतला असून, सोमवारी महापालिका आणि ग्रामस्थांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी माजी नगरसेवक पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

महापालिकेचे स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांनी ओला आणि सुका कचरा याबाबत माहिती देत नागरिकांना घरात कचऱ्याची अडचण होऊ नये, यासाठी दिवसातून दोनवेळा घंटागाडीची सुविधा उपलब्ध करून दिल्याचे सांगितले.

कुकशेतमधील आठ सार्वजनिक ठिकाणच्या कचराकुंड्या हटविण्यात आल्या असून, नागरिक देखील अभियानाला सहकार्य करीत आहेत. या बैठकीला माजी नगरसेविका सुजाता पाटील, जयश्री ठाकूर, महापालिकेचे स्वच्छता विभागाचे अधिकारी, ग्रामस्थ आणि सुमारे ९० टक्क्यांहून अधिक महिला सहभागी झाल्या होत्या.



**उलवे नोड : बहुजन बौद्ध बांधव सामाजिक संस्था व माता रमाई महिला मंडळाच्या वतीने सेक्टर २९ जय भीम चौक येथे भगवान गौतम बुद्ध यांची २५६७वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत गौतम बुद्धांना अभिवादन केले. या वेळी आयोजकांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.**

# वाशी येथे १५ मे रोजी वधू-वर मेळावा

**उरण :** वीरशैव लिंगायत समाजाच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना तर्फे विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी नवी मुंबई येथे सोमवारी (दि. १५) दुपारी २.३० ते ५ यावेळेत वधुवर मेळावा आयोजित करण्यात आला आहे. यानंतर क्रांतीसुर्य महात्मा बसवेश्वर जयंती विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी येथे आयोजित करण्यात आली आहे.

दोन्ही कार्यक्रम एकाच दिवशी एकाच ठिकाणी विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आले आहे. सदर वधु वर परिचय मेळावा निशुल्क आहे. वधुवर मेळावा व महात्मा बसवेश्वर जयंतीच्या अधिक माहितीसाठी उद्धव रामराव खराडे (८१०८४६४८१९), देवेंद्र कोराळे (९९८७०३०९६७), रमाकांत पाटील (९३२४५७२३९८), वैशालीताई मेनकुदळे (९८२०८९०१०१), वैशाली पाटील (९८३३६९२६४७), वैशाली लाठे (९०८२२९६९६९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांची बैठक

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. ६) सकाळी ११ वाजता माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने माजी विद्यार्थ्यांसाठी बैठकीचे आयोजन केले होते.




जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय तसेच इतर महाविद्यालयातील सर्व शाखेतील माजी विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत, त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गुरुजनांशी संवाद साधता यावा तसेच त्यांच्या अनुभवांचा फायदा महाविद्यालयासाठी व्हावा तसेच भविष्यामध्ये विद्यार्थ्यांमध्ये व महाविद्यालयांमध्ये चांगले ऋणानुबंध असावेत यासाठी या बैठकीचे आयोजन केले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांनी या बैठकीमध्ये महाविद्यालयातील सर्व शाखेतील माजी विद्यार्थ्यां व विद्यार्थिनी सोबत संवाद साधला व त्यांनी माजी विद्यार्थी संघटनेची नोंदणी विषयी तसेच माजी विद्यार्थी संघटनेचे सदस्यत्व तसेच भविष्यामध्ये माजी विद्यार्थी संघटनेच्या अंतर्गत वेगवेगळे उपक्रम घेण्यात येणार आहे याविषयी मार्गदर्शन केले.

या बैठकीचे आयोजन प्रा. अंकिता जांगिड (सचिव, माजी विद्यार्थी संघटना) यांनी केले तसेच प्रा. रेवन शिंदे यांनी माजी विद्यार्थी संघटने विषयी आपले विचार मांडले, प्रा. प्रवर शर्मा, प्रा. डॉ. अविनाश जुमारे यांनी सहकार्य केले तसेच बैठकीच्या शेवटी सर्वांचे आभार मानले.

### अनुभव कथन आणि कलांचे सादरीकरण

*या बैठकीमध्ये सर्व माजी विद्यार्थ्यांनी त्यांचे अनुभव कथन केले व भविष्यामध्ये महाविद्यालयांमध्ये व माजी विद्यार्थ्यांमध्ये असेच ऋणानुबंध असतील असे जाहीर केले. सभेच्या शेवटी काही माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या कलांचे प्रदर्शन करीत वेगळी गीते, नृत्ये सादर केली व बैठकीचा आनंद घेतला.*

# पत्रकारांसाठी उद्या आरोग्य शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जागतिक रेडक्रॉस दिनाचे औचित्य साधून ८ मे रोजी जर्नालिस्ट वेल्फेअर असोसिएशन नवी मुंबईच्या वतीने नवी मुंबईतील पत्रकारांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

बेलापूर सेक्टर १५ महापालिका मुख्यालयात सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत हे शिबिर होईल. उद्घाटन अतिरिक्त आयुक्त संजय काकडे यांच्या हस्ते होणार असून प्रमुख अतिथी ज्येष्ठ पत्रकार राहुल गडपाले असणार आहेत, असे असोसिएशनचे अध्यक्ष अशोक शेश्वरे यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला फ्रीझॉन हॉस्पिटलचे संचालक डॉ. सुशांत आंधळे यांचे सहकार्य लाभणार आहे. तज्ञ डॉक्टरदेखील उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती असोसिएशनचे सरचिटणीस नागमणी पांडे यांनी दिली. पत्रकारांचे आरोग्य व्यवस्थित राहावे म्हणून शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे असोसिएशनचे उपाध्यक्ष ओमप्रकाश ढोरे यांनी सांगितले.

# वातावरणातील बदलांचा ‘हापूस’ला फटका

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वातावरणातील बदलांमुळे यंदा हापूस आंब्याची आवक कमी झाली आहे. त्यामुळे हापूसचे दर वाढले असल्याने आमरसाचे घाऊक दरदेखील वाढले आहेत. घाऊक बाजारात तीन किलोच्या आमरसांसाठी ६०० रुपये मोजावे लागत असून प्रतिकिलोला हा दर ६० ते ७० रुपयांनी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

हापूसच्या हंगामात प्रक्रिया उद्योगासाठी कॅनिंग प्रक्रिया व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. यासाठी थेट बागायतदारांच्या बागेतूनच आंबा गोळा केला जातो. यंदा हापूसचे उत्पादन दरवर्षीच्या तुलनेने कमी असल्याने सुरुवातीपासूनच आंब्याचे बाजारातील दर स्थिर आहेत. पहिला हंगाम आटोपला असून दुसऱ्या टप्प्यातील आंब्याच्या आगमनाची प्रतीक्षा आहे. अशातच सध्या बाजारात कमी प्रमाणात आंबा दाखल होत असल्याने सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असल्याने अन्न प्रक्रिया दरांवरही त्याचा मोठा परिणाम झालेला आहे.

> **आंबा उत्पादन कमी असल्यामुळे कॅनिंगचे दर वधारले आहेत. परिणामी, आमरस, लोणची, पल्प, वडी, जाम आदी विविध उत्पादनांच्या दरात वाढ अपेक्षित आहे.**
>
> **-रामेश्वर बापट, आंबा प्रक्रिया व्यावसायिक**

आमरसाला देश-विदेशात मोठी मागणी आहे. पातळीवर मोठ्या प्रमाणावर छोटे-मोठे प्रक्रिया उद्योग असून त्यावर अनेकांचा उदरनिर्वाह चालतो. कॅनिंगचा आंबा खरेदी दर सध्या प्रतिकिलो ६५ ते ७० रुपये आहे. गतवर्षी हा दर ३७ ते ४० रुपये होता; तर स्थानिक बाजारपेठेत हापूस आंबा प्रतिडझन ६०० ते ८०० रुपयांना विकला जात असल्याने आमरसाच्या किमतींवर त्याचा परिणाम जाणवत आहे.

# लोप पावलेल्या प्राण्यांच्या नवी मुंबईत प्रतिकृती





**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील नेक्सस सीवुडस मॉलमध्ये लोप पावलेल्या महाकाय प्राण्यांची ४८ फुटी भव्य प्रतिकृती उभारण्यात आल्या आहेत.

मानवाचा उदय होण्यापूर्वी एकेकाळी हे प्राणी या भूतलावर राज्य करत होते. मात्र कालौघात हे प्राणी हळूहळू नष्ट होत गेले. फॅशन, खानपान, मनोरंजन या क्षेत्रांमध्ये ग्राहकांना नवनवीन अनुभव घेता यावेत यासाठी नेक्सस सीवुडस मॉल सातत्याने प्रयत्न करत असते. यात भर पडलीय ती थक्क करणाऱ्या आणि ज्ञानामध्ये भर घालणाऱ्या नव्या उपक्रमाची. नेक्सस सीवुडस मॉलमधील या उपक्रमाची सर्वत्र चर्चा होऊ लागली असून या मॉलमध्ये लोप पावलेल्या प्राण्यांची दुनिया ग्राहकांसमोर उभी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

द लॉस्ट वर्ल्ड या थीमवर आधारीत या उपक्रमामध्ये लाखो वर्षांपूर्वीचे प्राणी कसे होते हे सर्वसामान्यांना कळावे यासाठी भव्य प्रतिकृती उभारण्यात आल्या आहेत. ११ विविध प्राण्यांच्या प्रतिकृती पाहिल्यानंतर ग्राहक आणि खासकरून लहान मुलं खुश होतात. विशेष बाब ही आहे की हे प्राणी हलते असणार आहे, उदा. तुम्ही मॉलमध्ये आल्यानंतर दिसणारा केसाळ हत्ती हा त्याची सोंड हलवताना पाहायला मिळू शकेल किंवा लांब सुळे असणारा वाघ त्याचे सावज टीपताना नजरेस पडू शकेल. नव्या पिढीला लुप्त झालेले लाखो वर्षांपूर्वीचे जग कसे होते हे दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मानवाचे अस्तित्व निर्माण होण्यापूर्वीची ही दुनिया होती, जी या प्रतिकृतींद्वारे जिवंत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

झूल असलेला हत्ती, तीक्ष्ण सुळे असलेला वाघ यांच्याव्यतिरिक्त इथे लाखो वर्षांपूर्वीचे खवले मांजर, भलंमोठं अस्वल, जंगल, धबधबे आणि या वातावरणात राहणारे पशूपक्षी या मॉलमध्ये पाहायला मिळणार आहे. मॉलमध्ये येणाऱ्या बचेकंपनीला कला, हस्तकलेच्या माध्यमातून नवे ज्ञान देण्याचाही या निमित्ताने प्रयत्न करण्यात आला आहे.

# स्व. भास्कर पाटील सामाजिक विकास संस्थेची स्थापना

**उरण : बातमीदार**

गोरगरिबांना न्याय मिळवून देण्यासाठी स्व. भास्कर पाटील सामाजिक विकास संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.

उरण तालुक्यातील कोप्रोली येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पोलीस पाटील म्हणूण ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य निस्वार्थी भावनेने समाजासाठी अर्पण केले असे स्वर्गीय भास्कर म्हात्रे (पाटील) यांनी पोलीस पाटील म्हणून कार्यरत असताना उरण पूर्व विभागातील गोरगरिबांना न्याय निवाडा करून न्याय मिळवून दिला. त्यामुळे स्वर्गीय भास्कर म्हात्रे (पाटील) यांचे पणतू ॲड. प्रजन्य म्हात्रे यांनी सोमवार (दि. १) कोप्रोलीतील श्री गणेश मंदिर येथे स्व. भास्कर पाटील सामाजिक विकास संस्थेची स्थापना केली.

सर्वप्रथम गणेश पूजन, श्री छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करण्यात आले त्यानंतर दीप प्रज्वल करून नारळ वाढविण्यात आले. संस्थेच्या लोगोचे उद्घाटन सर्वांच्या उपस्थितीत करण्यात आले व संस्थेचे उदघाटन झाल्याचे अधिकृत रित्या जाहीर करण्यात आले. संस्थेच्या उद्घाटनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ३०हून अधिक व्यक्तींचा शाल सन्मानचिन्ह गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. विविध नागरिकांनी, ग्रामस्थांनी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी संस्थेबद्दल मनोगत व्यक्त करून संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र दिन व कामगार दिन असल्याने रायगड भूषण वैभव घरत यांचा मराठमोळा पोवाडा व शाहिरी गीतांचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला. या वेळी ॲड. प्रजन्य म्हात्रे, ग्रामस्थ मंडळ कोप्रोलीचे पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पर्यटकांचे लोंढे निघाले कोकणात

## माणगाव येथे महामार्गावर प्रवाशांची खरडपट्टी; लगीनघाई, सुट्यांमुळेही होतेय वाहतूक कोंडी

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकणचे प्रवेशद्वार म्हणून ओळखला जाणाऱ्या माणगाव शहरात सलग तीन दिवस लागलेल्या सुट्ट्या त्यातच लगीनघाई आणि पर्यटकांची कोकणात उसळलेली गर्दी यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीशी सामना करावा लागला. त्यातच दरवर्षीप्रमाणे यंदाचे वर्षीही मोठ्या प्रमाणात एप्रिल व मे महिन्यात लग्न असल्याने अनेकांची लगीनघाई तर कांहीची उन्हाळी सुट्टीसाठी लगबग त्यातच पर्यटकांची गर्दी यामुळे महामार्गावर तासनतास प्रवाशांची राखडपट्टी होत आहे. गेल्या महिन्यापासून सुट्ट्या शुक्रवार, शनिवार, रविवार तर कधी शनिवार, रविवार, सोमवार अशा आल्याने निसर्गाचे आकर्षण पर्यटकात वाढले असून मुंबई, पुणे व इतर जिल्ह्यातून पर्यटक मोठ्या प्रमाणात कोकणात उसळले आहेत. त्यामुळे माणगाव शहरात वाहतूक कोंडीवर यांचा ताण पडत आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी चे कोडेगेले महिनाभरापासून गुंतागुंतीचे होत असून सुटता सुटत नाही. त्यामुळे माणगावकरांची डोकेदुखी वाढली आहे.



माणगाव हे मुंबई गोवा महामार्गावरील मध्यवर्ती ठिकाण असल्याने या बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात सकाळपासून संध्याकाळ पर्यंत वाहतुकीची कोंडी होत आहे. त्यामुळे ही वाहतुकीची कोंडी माणगावकरांसह सर्वांचीच डोकेदुखी ठरली असून माणगावात वाहतूक कोंडीची साडेसाती कायम भेडसावत आहे. याकडे शासनाने गांभीर्याने पाहिलेले नाही. गेल्याच आठवड्यातील एप्रिल महिन्यातील शनिवार, रविवार तर मे महिन्यातील ता. १ महाराष्ट्र दिन अशी सलग सुट्टी होती. त्यामुळे तीन दिवस सलग माणगाव बाजारपेठेत वाहतूक कोंडी झाली होती.

### सर्वांसाठीच ठरतेय डोकेदुखी!

**मुंबई-गोवा महामार्गावरील इंदापूर ते टेमपाले दरम्यानच्या रखडलेल्या कामाला पाहिजे तेवढी गती मिळत नाही. त्यातच इंदापूर व माणगाव येथील बायपासच्या कामाला गती मिळत नाही. त्यामुळे पूर्वीच्याच मार्गावर या वाहतुकीची भर पडत आहे. त्यामुळे माणगाव बाजारपेठेतील वाहतुकीची कोंडी ही सर्वांचीच डोकेदुखी ठरत आहे.**

पुन्हा या महिन्यातच ५ मे शुक्रवार बुद्ध जयंती व शनिवार, रविवार अशी पुन्हा सलग तीन दिवस सुट्टी आल्याने वाहतूक कोंडी झाली आहे. पर्यटकांना असणारे कोकणातील निसर्गाचे आकर्षण यामुळे वाहतूक कोंडीचा फटका नागरिकांना सहन करावा लागला.

माणगाव बाजारपेठेतील पुणे-निजामपूर-माणगाव रस्ता, मोर्बा मार्ग तसेच मुंबई-गोवा महामार्गावर प्रवासी पर्यटकांच्या वाहनांच्या रांगा लांबच लांब लागल्या होत्या. माणगाव बायपास रस्त्याचे काम थांबल्यामुळे वाहतूक कोंडीवर आणखीनच भर पडली आहे. मात्र या महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम जलद गतीने झाल्यास माणगाव बाजारपेठेतील वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमचा निकाली निघेल अशी पर्यटकातून चर्चा होत आहे.

कोकणच्या विकासाचा मार्ग ठरणाऱ्या आणि वाढत्या अपघातांना पायबंद घालण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे आजही भिजत घोंगडे आहे. सामाजिक संघटना, कार्यकर्ते व प्रवाशांच्या रेट्यामुळे सरकारला या प्रश्नाकडे लक्ष घालावे लागले असले तरी शासनांनी या बाबत वेळकाढूपणा चालवला आहे.

प्रवासी नागरिकातून याबाबत असंतोष खदखदत आहे. इंदापूर ते महाड तसेच ताम्हिणी घाट ते माणगाव दरम्यान मोठ्या प्रमाणात अपघात दिवसेंदिवस होत असून या मार्गावरून प्रवाशांना प्रवास असुरक्षित वाटत आहे. या दरम्यानच्या मार्गावर अनेकांचे अपघातात निष्कारण बळी जात आहेत.

# वावंढळ येथील दुकानात चोरी; रोख रक्कम लंपास

**चौक : प्रतिनिधी**

वावंढळ येथील सुप्रिया सुधीन कदम यांच्या दुकानात पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास चोरी झाली असून चोराने पद्धतशीर दुसऱ्याच्या घरावरून दुकानात प्रवेश करून फक्त रोख रक्कम घेऊन पलायन केले आहे. त्यामुळे पुन्हा चोरांचा सुळसुळाट सुरू होतो की काय अशी शंका व्यक्त केली जात आहे.



खालापूर तालुक्यातील वावंढळ गावात गावच्या प्रवेशद्वारा जवळच रस्त्याच्या कडेला सुप्रिया कदम यांचे राहते घर असून घरातच दुकान आहे. पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोराने पहील्या मजल्यावर चढून, लोखंडी ग्रीलचा दरवाजा वाकवून त्याची कडी काढली आणि घरातील आतल्या बाजूस असलेल्या जिन्याने उतरून दुकानात प्रवेश करत दिवसभराचा गल्ला व दुकानात माल आणण्यासाठी ठेवण्यात आलेली रोख रक्कम घेऊन पोबारा केला आहे. श्वान भुंकत असल्याने घरातील माणसे उठली. तेव्हा त्यांच्या निदर्शनास चोरी झाल्याचे समजले. तात्काळ चौक पोलिसांना कळविल्यावर पहाटे साडेतीन वाजता पोलिसांनी येऊन पाहणी केली. या दुकानाच्या समोर कायम लाईट असते, तर येथे पथदिवा देखील आहे. सतत रस्त्याने जाणारे येणाऱ्यांची वर्दळ असते. घरात श्वान देखील आहे. तरीही ही चोरी दुसऱ्याच्या घरावरून येऊन पहिल्या मजल्यावर चढून गेल्यावर ही चोरी झाल्याचे प्राथमिक निष्कर्ष काढण्यात आला आहे.

अज्ञात चोरांने दुकानातून दुसरी वस्तू चोरली नाही, टीपॉयवर मोबाईल, लॅपटॉप होते. चौकचे सपोनि युवराज सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोह. वहाडकर आणि राठोड तपास करीत आहेत.

# मध्य रेल्वे कोकण विभागासाठी २६ उन्हाळी विशेष गाड्या चालवणार

**रोहे : प्रतिनिधी**

शाळांना सुट्या जाहीर झाल्या आहेत. मुले मामाच्या गावी जाण्यासाठी तयारीला लागले असून चाकरमानी सुध्दा आपल्या कोकणातील गावी जाण्यासाठी तयारी करीत आहे. गावी जाण्यासाठी गाडी कुठली पकडायची या विचारात असताना या कोकणवासीयांना रेल्वेकडे खुशखबरी मिळाली आहे.

सुट्यांमध्ये प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन रेल्वे लोकमान्य टिळक टर्मिनस ते थिवि दरम्यान अतिरिक्त उन्हाळी विशेष गाड्या चालवणार आहे. मध्य रेल्वेने याआधीच ९१६ उन्हाळी विशेष चालवण्याची घोषणा केली आहे आणि या अतिरिक्त उन्हाळी विशेषसह या वर्षी एकूण उन्हाळी स्पेशलची संख्या ९४२ होणार आहे.

कोकणवासीयांसाठी चालविण्यात येणाऱ्या २६ विशेष गाड्यांमध्ये ०११२९ विशेष गाडी ६ मे ते ३ जूनपर्यंत दर शनिवार, सोमवार आणि बुधवारी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून २२.१५ वाजता सुटेल आणि थिवि येथे दुसऱ्या दिवशी ११.३० वाजता पोहोचेल. तर ०११३० विशेष गाडी ७ मे ते ४ जूनपर्यंत दर रविवार, मंगळवार आणि गुरुवारी थिवि येथून १६.४० वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ०४.०५ वाजता पोहोचेल. या गाड्यांसाठी ठाणे, पनवेल, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, सावर्डा, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, ओरोस, कुडाळ आणि सावंतवाडी रोड हे थांबे देण्यात आले आहेत. या गाड्यांची संरचना एक प्रथमसह द्वितीय वातानुकूलित, एक द्वितीय वातानुकूलित, दोन तृतीय, १० शयनयान, दोन गार्ड्स ब्रेक व्हॅनसह ४ सामान्य द्वितीय श्रेणी अशी आहे.

या गाडयांसाठी आरक्षण विशेष गाडी क्रमांक ०११२९/०११३० साठी विशेष शुल्कासह बुकिंग दि. ४.५.२०२३ रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि ु.ळीलींल.ले.ळप या संकेतस्थळावर सूरु होणार आहे.तपशीलवार वेळ आणि थांब्यासाठी ु.शर्पीीळ्ू.ळपवळरपीरळश्र. र्सीं.ळप ला भेट द्या किंवा छढएड डाउनलोड करून घेण्याचे आवाहन छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई जनसंपर्क विभाग, मध्य रेल्वे यांच्या द्वारा काढण्यात आलेल्या पत्रकाद्वारे माहिती देण्यात आली आहे.

# टाटा स्टील कंपनीतील कामगाराची आत्महत्या

**खोपोली : प्रतिनिधी**

शिळफाटा भागातील यशवंतनगर वसाहतीत विश्वकर्मा सहा (२९) या तरुणाने शनिवारी सकाळी आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

हा तरुण टाटा स्टीलमध्ये नोकरीला होता. पती-पत्नी यांचा अनेक दिवसापासून कौटुंबिक वाद होता आणि त्या नैराशेतून त्यांनी आत्महत्या केल्याचे बोलले जात आहे. सकाळी पत्नी कामावर गेल्यानंतर विश्वकर्मा यांनी गळफास घेऊन आपले जीवन संपविले.

घटनेची माहिती मिळतात सहाय्यक पोलीस निरीक्षक हरेश काळसेकर यांनी घटनास्थळी दाखल झाले. यासंदर्भात आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. घटनेबाबत पोलीस हवालदार घरत पुढील तपास करीत आहेत.

# मुरूड डॉक्टर असोसिएशनतर्फे सचिन वाणी यांचा सत्कार

**मुरुड : प्रतिनिधी**



मुरुड पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सचिन वाणी याना पालकमंत्री उदय सामंत व स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते पोलीस महासंचालक पदक बहाल करण्यात आले आहे.

मुरुड पोलीस हद्दीत झालेल्या विविध गुन्ह्यामध्ये प्रमुख आरोपीला जेरबंद करण्यात महत्वाची भूमिका सचिन वाणी यांनी बजावली होती. त्याच प्रमाणे ते लाच लुचपत विभागात कार्यरत असताना सुद्धा मोठ्या पदावरील शासकीय अधिकारी याना लाच घेताना रंगेहात पकडण्यात त्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली होती.या सर्व महत्वपूर्ण कामगिरीची दखल घेत त्यांना पोलीस महासंचालक पदक बहाल करण्यात आले आहे. त्यांना हे पदक प्राप्त होताच मुरुड डॉक्टर असोशिएशनतर्फे त्यांचा सत्कार मुरुड पोलीस ठाण्यात करण्यात आला.

यावेळी डॉक्टर असोशिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील यांच्या हस्ते सचिन वाणी यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी माजी वैद्यकीय अधिकारी डॉ. मंगेश पाटील, डॉ. राज कल्याणी, डॉ. मयूर कल्याणी, डॉ. इप्सित पाटील, डॉ. अहमद कलबस्कर, डॉ. अमित बेनकर, पटेल क्लिनिकल लॅबोरेटरीचे संचालक सुनील पटेल, डॉ. अभिषेक पाटील उपस्थित होते.

यावेळी डॉ. राज कल्याणी यांनी सचिन वाणी कर्तव्यदक्ष अधिकारी आहेत. त्यांनी त्यांच्या सेवेत विविध तपास उलगडले व आरोपीना जेरबंद केले आहे. चांगल्या अधिकाऱ्याला पोलीस महासंचालक पदक मिळाले याचा आम्हाला अभिमान आहे.

# रक्तगट जुळत नसतानाही आईने किडनी दिल्यामुळे मुलाला जीवदान




**कर्जत : प्रतिनिधी**

रूग्ण आणि किडनीदाता या दोघांचेही रक्तगट वेगळे असताना किडनी प्रत्यारोपण करण्याची शस्त्रक्रिया खारघर येथील मेडिकव्हर रूग्णालयात यशस्वरित्या पार पडली आहे. कर्जतमधील एका १७ वर्षांच्या मुलाला त्याच्या आईने रक्तगट जुळत नसतानाही आपली किडनी दान करून मुलाला पुनर्जन्म दिले आहे. यामुळे रूग्णाला जीवदान मिळाले असून रक्तगट जुळत नसतानाही शस्त्रक्रिया करण्याचे आव्हान डॉ. अमित लंगोटे आणि त्यांच्या टीमेने यशस्वी पार पाडले.

धनराज मेंढरे हा मुलगा किडनी आजाराने त्रस्त होता. या मुलाचे वडील नसल्याने कुटुंबाची स्थिती कमकुवत होती. अडचणीच्या परिस्थितीतून मुलाच्या आईने पुढे येऊन रक्तगट वेगळा असतानाही किडनी दान करण्याचा निर्णय घेतला व मुलाला नवीन आयुष्य मिळाले आहे. मेडिकव्हर रूग्णालयातील किडनीविकार तज्ञ आणि किडनी प्रत्यारोपण विभागाचे प्रमुख डॉ. अमित लंगोटे यांनी वेगवेगळ्या रक्तगटाच्या किडनी प्रत्यारोपण करण्याचे आवाहन स्वीकारले. रूग्ण व मूत्रपिंडदाता या दोघांचे रक्तगट वेगळे असतानाही ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आली.

खारघर येथील मेडिकव्हर रूग्णालयातील किडनीविकार तज्ञ डॉ. अमित लंगोटे म्हणाले, जेव्हा तो आमच्याकडे आला तेव्हा हा मुलगा बेशुद्ध पडला होता. त्याचा श्वासोच्छ्वासही कमी झाला होता. प्राथमिक स्थितीत त्याला किडनीचा आजार असल्याचं लक्षात आले. किडनीमध्ये जी घाण असते ती डोक्यात पोहचून त्याची प्रकृती कोणत्याही क्षणी गंभीर झाली असती. मुलाला फिट्स सुद्धा येऊ शकल्या असत्या. अशा स्थितीत त्याला तातडीने रूग्णालयात दाखल करून वैदयकीय चाचण्या करणं गरजेचं होतं. त्यानुसार वैद्यकीय अहवालात किडनीच क्रिएटिन पातळी खूप जास्त असल्याचं लक्षात आलं. कॅल्शियमचं प्रमाणही खूपच कमी होतं. अशा स्थितीत मुलाच्या दोन्ही किडनी निकामी झाल्याचं निदान झाल. अशावेळी तातडीने किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करणं गरजेचं होतं. प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी कुटुंबियांचे समुपदेशन केल्यानंतर आईने किडनी दान करण्याची इच्छा व्यक्त केली. परंतु, आईचं रक्तगट बी पॉझिटिव्ह होता तर मुलाचा ए पॉझिटिव्ह. किडनी प्रत्यारोपणासाठी रक्तगट एकसमान असणं गरजेचं असते. मात्र रक्तगट वेगळे असतानाही हे किडनी प्रत्यारोपण करण्याचे आवाहन यशस्वी पार पाडले.

### डॉक्टरांच्या सहकार्याने मुलाचे प्राण वाचले!

**रूग्णाच्या आईने प्रतिक्रिया देताना सांगितले की, 'माझ्या मुलाला किडनीचा आजार असल्याचं निदान झाल्याने आम्ही खूप घाबरलो होतो. डॉक्टरांनी आम्हाला प्रत्यारोपण करण्याचा सल्ला दिला. पण शस्त्रक्रियेसाठी पुरेसे पैसे नसल्याने डॉक्टरांनी आणि रूग्णालयाने आम्हाला सहकार्य केले. मुलाला जीवदान देण्यासाठी मी किडनी दान करण्याची इच्छा व्यक्त केली. परंतु, रक्तगट वेगळे असल्याने शस्त्रक्रिया करणं अवघड होतं. मात्र, अशा स्थितीत डॉक्टरांनी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करून मुलाचे प्राण वाचवले आहे. माझ्या मुलाला नवीन आयुष्य दिल्याबद्दल मी डॉक्टरांचे आभार मानते.**

# आरोपीवर कठोर कारवाई करावी

## गोमाता हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील हाल खुर्द हद्दीत माणुसकीला काळिमा फासणारी घटना, बुधवारी सकाळी महड गावात गोठ्यात बांधलेली गाय आणि तिचा वासरू या दोघांची चोरी करून हाल गावात एक पत्र्याच्या खोलीत हत्या करण्यात आल्याचे समोर आले होते. मालकाच्या गोठ्यातील गाय व वासरू नसल्याचे सोमवारी सकाळी लक्षात आल्याने शोधाशोध करीत असताना मंगळवारी शोध मोहिमेवर असताना पत्र्याच्या शेडमध्ये गाय व वासरू मृतावस्थेत रक्ताच्या थारोळ्यात दोन्ही गुरे नजरेस पडल्याने ही हदय हेलावणारी घटना समोर आली. या घटनेनंतर संपूर्ण तालुक्यात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.



गो मातेच्या हत्येच्या निषेधार्थ खालापूर तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना खालापूर सकळ हिंदू समजाकडून निवेदन देण्यात आले

खालापूर तालुका सकल हिंदू समाज, खालापूर तालुका महाराष्ट्र वारकरी महामंडळ संप्रदाय, विश्वहिंदू परिषद कोकण प्रांत, बजरंग दल, वेध सह्याद्री व वावोशी छत्तीशी विभाग यांच्या वतीने खालापूर तहसीलदार व खालापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले.

दोन दिवसापूर्वी महड येथे हाल गावामध्ये घडलेल्या गो मातेच्या हत्येच्या निषेधार्थ निवेदन देण्यात आले असून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी तसेच असे प्रकार घडू नये, म्हणून शांततेच्या मार्गाने निवेदन देण्यात आले. यावेळी शशिकांत मोरे, महेश पाटील, संदेश पाटील, आकाश घरडे, जयेंद्र पाटील, दिनेश महाडिक, ज्ञानेश्वर पाटील, काशिनाथ पार्टे, पंकज पालांडे, रुपेश लबडे, सूर्यकांत लोते, भगवान देशमुख, संदीप सुर्वे, योगेश कदम, हनुमंत लबडे आदी उपस्थित होते.

# खालापूर तहसील कार्यालयात मान्सूनपूर्व तयारीसाठी बैठक; उपाययोजनांवर चर्चा



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर कर्जतचे उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांनी सर्व शासकीय, निम शासकीय कार्यालय प्रमीखांची बैठक आयोजित करून दरडप्रणव, धरणक्षेत्र, तलाव, धबधबे या ठिकाणी करावयाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर सूचना व मार्गदर्शन केले.

खालापूर तहसील कार्यालयात आयोजित बैठकीत सर्व खात्याच्या विभाग प्रमुख यांना आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे व आपल्या मोबाईल नंबर सह माहिती सादर करण्याचे आदेश दिले. सर्व विभागांनी नोडल अधिकारी यांची नेमणूक करणे, त्यांचा मोबाईल नंबर देणे आणि मोबाईल बंद न ठेवणे, विना परवाना मुख्यालय सोडू नये, तालुक्यात उद्भवणात येणाऱ्या संभाव्य आपत्तीत तात्काळ प्रतिसाद देण्याचे निर्देश देण्यात आले.

नैसर्गिक आपत्ती २०२३-२४ च्या अनुषंगाने तहसिल कार्यालय खालापूर येथे २४ तास तालुका नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहे. ०२१९२-२७५०४८ आणि ८२६२८९७८८ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

बैठकीस तहसिलदार आयुब तांबोळी, गटविकास अधिकारी बालाजी पुरी, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, खोपोली नगरपरिषद मुख्याधिकारी अनुप दुरे, खालापूर नगर पंचायत मुख्याधिकारी रश्मी चव्हाण, वरीष्ठ पोलिस निरीक्षक बाळा कुंभार, अग्निशमन दल प्रमुख आशिष मोरे, मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडेकर यांच्यासह खोपोली, रसायनी, खालापूरचे पोलीस अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग चे राकेश राखाडे,मोरबे धरण प्रशासन, पाठबंधारे विभाग कर्जत,खालापूर, प्राथमिक आरोग्य केंद्र प्रमुख डॉ. रेश्मा नागरगोजे, सहायक अभियंता महावितरण खोपोली,खालापूर,रसायनी,चौक, कृषी अधिकारी, उप अधीक्षक भूमी अभिलेख, वन विभाग,शिक्षण अधिकारी,भारत दूर संचार निगम, एकात्मिक बाल विकास, दुय्यम निबंधक, पशू वैद्यकिय विभाग, मंडळ अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र अशा ३२ विभाग प्रमुख हे बैठकीला उपस्थित होते.




# माणगावच्या शिक्षिका मंगला कुथे शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित

**माणगाव : प्रतिनिधी**

अलिबाग येथे माजी आमदार शिवाजीराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त प्राथमिक शिक्षक संघ रायगड शिवाजीराव पाटील गट यांच्यातर्फे रायगड शिक्षक रत्न पुरस्काराने गुणवंत शिक्षकांना गौरविण्यात आले. यात माणगाव तालुक्यातील कर्तृत्ववान, विद्यार्थी प्रिय शिक्षिका मंगला महादेव कुथे यांचा शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास प्राथमिक शिक्षक संघ रायगड शिवाजीराव पाटील गट जिल्हाध्यक्ष राजेंद्र म्हात्रे, जिल्हा सचिव जीवन तेलंगे, महिला आघाडी प्रमुख रायगड विनया जाधव, माणगाव तालुका अध्यक्ष दत्ता शिर्के, तज्ञ सल्लागार सचिन कदम अविनाश पतपेढी व्हाईस चेअरमन निलेश साळवी अलिबाग पतपेढी संचालक वैभव पिंगळे, रंजिता पिंगळे पेण पतपेढी माजी संचालिका सौ.म्हात्रे, पेण पतपेढी संचालक जगदिश म्हात्रे, पूर्ण कुथे कुटूंब व मित्र परिवार याप्रसंगी आदरनिय मंगला कुथे बाईच कौतुक करतेस उपस्थित होते.

अमरावतीची कन्या माणगाव तालुक्यातील लोणशी मराठी शाळेत १९८९ ला हजर झाली. प्रशासकीय बदलीने पालघर शाळेत १९९९ला कार्यरत झाली. १०वर्षाने पुन्हा प्रशासकीय बदलीने तळा तालुक्यातील भानंग येथे ९ वर्ष सेवा केली. आज अनेक वर्षांपासून उत्तम कार्य करणारी शिक्षिका हिचा सन्मान करताना आनंदाचे अश्रू डोळ्यातून आले.

# गुजरातचा राजस्थानवर ‘रॉयल’ विजय

**जयपूर : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये शुक्रवारी झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सने राजस्थान रॉयल्सचा नऊ गडी राखून पराभव केला. राजस्थान संघ प्रथम फलंदाजी करताना १७.५ षटकांत ११८ धावांत गारद झाला होता. धावांचा पाठलाग करताना गुजरातने १३ षटकांत नऊ गडी राखून दणदणीत विजय साकारला. या विजयासह गुजरात संघ गुणतालिकेत पहिल्या स्थानावर पोहचला आहे.



जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातने चांगली सुरुवात केली. वृद्धिमान साहा आणि शुभमन गिल यांनी पहिल्या विकेटसाठी ९.४ षटकांत ७१ धावांची भागीदारी केली. शुबमन ३५ चेंडूंत ३६ धावा करून बाद झाला. गिल बाद झाल्यानंतर साहाने कर्णधार हार्दिक पांड्यासोबत सामना संपवला. साहाने ३४ चेंडूंत पाच चौकारांच्या मदतीने नाबाद ४१ धावा केल्या. त्याचवेळी हार्दिकने १५ चेंडूंत ३९ धावा करून नाबाद राहिला. त्याने तीन चौकार आणि तीन षटकार मारले.

तत्पूर्वी, या सामन्यात राजस्थानचा कर्णधार संजू सॅमसनने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. राजस्थानची सुरुवात पुन्हा चांगली झाली नाही आणि जॉस बटलर केवळ आठ धावा करून बाद झाला. त्याला हार्दिक पांड्याने मोहित शर्माच्या हाती झेलबाद केले. सॅमसन आणि यशस्वी जैस्वाल यांनी दुसऱ्या विकेटसाठी जलद ३६ धावा जोडल्या, पण यशस्वी ११ चेंडूंत १४ धावा करून धावबाद झाला. लवकरच राजस्थानला आणखी एक धक्का बसला जेव्हा कर्णधार संजू सॅमसन १९ चेंडूंत ३० धावा करून जोशुआ लिटलच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यानंतर राजस्थानने वारंवार अंतराने विकेट गमावल्या आणि परिणामी संघ संपूर्ण षटक देखील खेळू शकला नाही आणि १७.५ षटकात ११८ धावा करून बाद झाला.

गुजरातचा हा मोसमातील सातवा विजय आहे. त्यांचे आता १० सामन्यांत १४ गुण झाले आहेत. गुजरातचा संघ केवळ तीन सामने हरला आहे. दुसरीकडे, या पराभवानंतर राजस्थान चौथ्या स्थानावर गेला आहे. त्यांचे पाच विजय आणि पाच पराभव झाले आहेत. त्यामुळे या संघाचे १० सामन्यांत १० गुण आहेत.

# गोल्डन बॉय नीरज चोप्राने दोहा डायमंड लीग जिंकली

**कतार : वृत्तसंस्था**

भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्राने नव्या मोसमाची शानदार सुरुवात करीत दोहा डायमंड लीगचे विजेतेपद पटकाविले आहे. दोहाच्या कतार स्पोर्टस् क्लबमध्ये झालेल्या स्पर्धेत नीरजने पहिल्याच प्रयत्नात ८८.६७ मीटर भाला फेकत डायमंड लीगवर आपले नाव कोरले. टोकियो ऑलिम्पिकमध्ये रौप्यपदक जिंकणारा चेक खेळाडू जेकोब वडलेच दुसऱ्या स्थानावर राहिला.

एक महिन्यापूर्वी लुझने येथे डायमंड लीग स्पर्धा जिंकणारा नीरज पहिला भारतीय ठरला होता. त्यानंतर आता त्याने दोहा डायमंड लीग मीटमध्ये ८८.६७ मीटर भाला फेकत ही स्पर्धासुद्धा जिंकली. त्याने पहिल्याच थ्रोमध्ये सर्वोत्तम आकडा गाठला. यासह नीरजने पुन्हा एकदा इतिहास रचला आहे. त्याने ८८.६७ मीटर फेक करून पहिले, झेक प्रजासत्ताकच्या जेकब वडलेजने ८८.६३ मीटर फेकसह दुसरे, तर ग्रेनेडाच्या अँडरसन पीटर्सने ८५.८८ मीटर फेकसह तिसरे स्थान मिळविले.

नीरज हा सध्याचा डायमंड लीग चॅम्पियन आहे. नीरजची वैयक्तिक सर्वोत्कृष्ट कामगिरी ८९.९४ मीटर आहे, जो राष्ट्रीय विक्रमही आहे.




२०१८मध्ये दोहा डायमंड लीगमधील त्याच्या एकमेव सहभागामध्ये त्याने ८७.४३ मीटरसह चौथे स्थान मिळवले. एकूण फिटनेस आणि ताकद नसल्यामुळे नीरज गेल्या वर्षी दोहा डायमंड लीगला मुकला होता. गेल्या सप्टेंबरमध्ये झुरिचमध्ये २०२२ ग्रँड फिनाले जिंकल्यानंतर डायमंड लीग चॅम्पियन बनणारा तो पहिला भारतीय ठरला. एक महिन्यापूर्वी तो लुझने येथे डायमंड लीग स्पर्धा जिंकणाराही पहिला भारतीय ठरला होता.

दोहा येथे होणारी ही स्पर्धा डायमंड लीग मालिकेतील पहिला टप्पा आहे. १६ आणि १७ सप्टेंबर रोजी यूजीनमध्ये डायमंड लीग फायनलसह स्पर्धेचा समारोप होणार आहे.



# कराटे स्पर्धेत नागोठण्यातील खेळाडूंची चमक

**नागोठणे : बातमीदार**

माणगाव येथे नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत नगोठण्यातील खेळाडूंनी मास्टर धनंजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली चमकदार कामगिरी करून २३ सुवर्ण, दोन रौप्य, व आठ कांस्यपदक जिंकून प्रथम क्रमांकाच्या चषकावर आपले नाव कोरले.

स्पर्धेत प्रशांत प्रकाश सारगे, यश हिरामण म्हात्रे, समर नरेश ठाकूर, रोहित परशुराम गायकवाड, अक्षय अशोक मांडवकर, रोहन राजेंद्र रोडेकर, गौरव रवींद्र राऊत यांनी प्रत्येकी दोन सुवर्णपदके; अनिश किरण पालकर, रूचल चंचल जाना यांनी सुवर्णपदक व रौप्यपदक; श्रयश सचिन शेडगे, जय शेखर गोळे, उमेद जितेंद्र जाधव, तेजस नामदेव साळुंके यांनी सुवर्णपदक व कांस्यपदक; आयुष महेंद्र म्हात्रे, पीयुष साळुंके, ओमकार नामदेव साळुंके यांनी सुवर्णपदक; दिपांशू नरेश माळी रौप्यपदक व अनुज शिंदे याने कांस्यपदक जिंकले. या खेळाडूंचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# नवी मुंबईत भाजपतर्फे क्रीडा महोत्सव

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष प्रभाग क्रमांक ३४ नेरूळ आयोजित क्रीडा महोत्सवास माजी महापौर सागर नाईक यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. माजी नगरसेवक सुरज पाटील यांच्या पुढाकाराने शुक्रवारपासून सुरू झालेल्या या महोत्सवात विविध खेळांच्या स्पर्धा सलग तीन दिवस कुकशेत गाव येथील गावदेवी मैदानात खेळल्या जात आहेत. त्यास खेळाडू व क्रीडाप्रेमींचा प्रतिसाद मिळत आहे.

या क्रीडा महोत्सवात बुद्धिबळ, कॅरम, १०० मीटर व २०० मीटर धावणे, क्रिकेट तसेच महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी पाककला आदी स्पर्धांचा समावेश आहे. प्रत्येक स्पर्धेत मोठ्या संख्येने स्पर्धकांनी सहभाग घेतला आहे.



मोबाईलच्या युगात मैदानी खेळापासून आपली भावी पिढी दुरावत चालली आहे. याची जाण असणाऱ्या कुकशेत गावचा आदर्श विकास करणारे माजी नगरसेवक सुरज पाटील यांनी या क्रीडा महोत्सवाचे भव्य व सुरेख आयोजन केले आहे, असे सांगून या वेळी माजी महापौर सागर नाईक यांनी सुरज पाटील यांच्या कार्याचे कौतुक केले.

कोरोना काळात मोबाईल विश्वात हरवलेली पिढी मैदानात उतरून त्यांच्यात मैदानी

## स्पर्धकांचा प्रतिसाद

खेळांविषयी आवड निर्माण व्हावी व उद्याचे आदर्श खेळाडू निर्माण होऊन त्यांनी नवी मुंबई शहराचे नावलौकिक उंचवावा म्हणून हा क्रीडा महोत्सव आयोजित केला असून त्यास मोठा प्रतिसाद लाभत असल्याचे आयोजक माजी सुरज पाटील यांनी सांगितले.

या वेळी व्यासपीठावर माजी सरपंच बाळाराम पाटील, श्रीकांत पाटील, विनोद पाटील, संजय चौधरी, रविकांत तांडेल, शशिकांत तांडेल, श्रीकांत परब आदी उपस्थित होते.

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी माजी नगरसेविका सुजाता पाटील, जयश्री ठाकूर, बजरंग माने आदींसह भाजप कार्यकर्ते योगदान देत आहेत.

# माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते पनवेल चॅम्पियन्स लीगचे उद्घाटन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि.(टीआयपीएल) च्या सौजन्याने पनवेल चॅम्पियन्स लीग या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल महापालिकेच्या छत्रपती संभाजी महाराज मैदानावर होत असलेल्या या दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. ६) झाले.

या स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेत्या संघास ४० हजार आणि सन्मानचिन्ह, तर दुसऱ्या क्रमांकास २० हजार आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेत रंगतदार सामने होत आहेत.

स्पर्धेच्या उद्घाटनावेळी अस्लम मुन्शी, अस्लम मास्तर, राजू पटेल, मतीन मास्तर, सुफियान पटेल, आतिफ मास्ते, आप्पा पावसकर आदी उपस्थित होते. या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी खेळाडूंना शुभेच्छा देत अशाच प्रकारच्या स्पर्धांचे जास्तीत जास्त प्रमाणात आयोजन करण्यासाठी प्रोत्साहित केले.

# गंभीरसोबतच्या वादप्रकरणी विराटचे बीसीसीआयला पत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काही दिवसापूर्वी विराट कोहली आणि गौतम गंभीर मैदानावर भिडले होते. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि लखनऊ सुपरजायंट्स यांच्यातील सामना संपल्यानंतर हा वाद झाला. यानंतर पाच दिवसांनी विराटने भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (बीसीसीआय) पत्र लिहून आपली चूक नसल्याचे म्हटले आहे.

## चूक नसल्याचा दावा; दंड आकारल्याने नाराज



विराटचा लखनऊ सुपरजायंट्सच्या नवीन-उल-हकसोबतही वाद झाला होता. यानंतर बीसीसीआयने बंगळुरूचा स्टार फलंदाज विराट आणि लखनऊचा मेंटर गंभीर यांना मॅच फीच्या १०० टक्के, तर नवीनला ५० टक्के दंड ठोठावला. मीडिया रिपोर्ट्समध्ये असा दावा केला जात आहे की, १००% मॅच फी दंडानंतर विराट कोहली बीसीसीआयवर नाराज आहे. याबाबत त्याने बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांकडे नाराजी व्यक्त केली आहे.

विराट कोहलीने बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांसमोर स्पष्टीकरण देताना म्हणाला की, मी नवीन-उल-हक आणि गौतम गंभीर यांना काहीही बोललो नाही. माझी चूक नाही, पण तरीही मला दंड ठोठावण्यात आला आहे.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com